
# द्रष्टा श्रमयोगी



समग्र प्रबोधन केंद्र, पुणे.

- प्रकाशक :

समग्र प्रबोधन केंद्र
द्वारा श्रमसेवा न्यास
१३६० शुक्रवार पेठ,
पुणे : ४११००२.

- सहयोग राशी : रु. २०/-

- पहिली आवृत्ती
दि. २६ ऑक्टोबर २००४

- सौजन्य :

१) स्वर्गीय शरद देवधर प्रतिष्ठान
२) दि. युनायटेड वेस्टर्न बँक कर्मचारी संघ
३) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग एज्युकेशन अँड रिसर्च
४) भारतीय मजदूर संघ, पुणे.

# द्रष्टा श्रमयोगी

श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडीजी यांचे पुण्यात १४ ऑक्टोबर २००४ रोजी दुःखद निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहणारे

★ *काही लेख*

★ *एक भाषण*

★ *काही आठवणी*

★ *काही अग्रलेख*

# जीवनप्रवाह

## (स्व. दत्तोपंत ठेंगडीजींच्या जीवनप्रवाहातील मुख्य टप्पे)

- जन्म दि.१० नोव्हेंबर १९२०. महाराष्ट्र-विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील आर्वी या गावी.
- १९४१ मध्ये वकिलीची पदवी.
- १९४१ पासूनच रा. स्व. संघाचे प्रचारक म्हणून कामास सुरुवात.
- ९ जुलै १९४९, 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची' स्थापना.
- १९५० मध्ये 'भारतीय जनसंघा'च्या स्थापनेत सहभाग.
- मजदूर क्षेत्रातील अनुभवासाठी इंटक व आयटक मध्ये सक्रिय काम केले. याच काळात डॉ. आंबेडकरांशी संबंध व काही काळ त्यांचे सहाय्यक म्हणून काम.
- २३ जुलै १९५५, भोपाळ येथे 'भारतीय मजदूर संघाची' स्थापना.
- १९६४ ते १९७६ या काळात राज्यसभेचे सदस्य.
- १९६८-६९ मध्ये संसदीय शिष्टमंडळाच्या माध्यमातून रशिया व हंगेरीचा दौरा.
- १९७७ जिनिव्हा येथे आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व.
- ४ मार्च १९७९ 'भारतीय किसान संघाची' स्थापना.
- १४ एप्रिल १९८३ 'सामाजिक समरसता मंचची' पुणे येथे स्थापना.
- २२ नोव्हेंबर १९९१ 'स्वदेशी जागरण मंचाची' स्थापना.
- १४ ऑक्टोबर २००४ रोजी पुणे येथे देहावसान.

# लोकोत्तर प्रतिभेचा वास्तववादी विचारवंत

'आणीबाणीने अनेकांना देशोधडीला लावले. आणीबाणीने कित्येकांचे संसार उध्वस्त केले. आणीबाणीने कितीतरी सामाजिक संस्थांना भुईसपाट केले. आणीबाणी हा आधुनिक भारताच्या इतिहासातील एक काळोखा कालखंड होता.' आणीबाणीच्या संदर्भातील हे एक सर्वसमान व सार्थ अभिमत! मला मात्र आणीबाणीच्या संदर्भातील यापेक्षा वेगळा अनुभव आला; एकाअर्थी माझा फायदाच झाला म्हणा ना! त्या काळोख्या अंधारातच मला एक सतत तेवणारी प्रकाशज्योत दिसली - आपल्या प्रकाशाने अनेक संभ्रमितांच्या डोक्यात सुस्पष्ट विचारांचा ज्ञानदीप पेटवणारी- स्वत:च्या जळण्यातून अनेक संघटनांना जन्माला घालून विश्वसूर्याचा प्रकाश दाखविणारी- आपल्या चिंतनातून अनेक संस्थांना सैद्धान्तिक भूमिकेचे तेज देत त्यांचा मार्ग प्रकाशमान करणारी! त्या ज्योतीचे नाव दत्तोपंत ठेंगडी!

*वसंत नारायण तांबे*

दत्तोपंतांचे पहिले, प्रत्यक्ष दर्शन आणीबाणीच्या काळातले, पॅन्ट व बुशकोट अशा आधुनिक वेषभूषेतले ! बैठकीसाठी अपेक्षित अन्य कार्यकर्ते एकत्र होईपर्यंत हाताला लागेल त्या पुस्तकाच्या वाचनात गढून जाणारे, काहीसे अबोल वाटणारे दत्तोपंत, प्रथमदर्शनी अनुभवातला पूर्वार्ध शतश: सार्थ ठरविणारे आणि उत्तरार्ध मात्र पूर्णत: चुकीचा ठरविणारे, एक अजब व्यक्तिमत्त्वच म्हणावे लागेल. प्रकांड पंडित या बिरुदाचा अर्थ पटविणारे दत्तोपंत इतके बोलके आहेत की त्यांच्या सहवासात येणाऱ्या कोणालाही चकित व्हायला व्हावे.

**विद्या विनयेन शोभते।**

एखाद्या सभेतील, त्यांच्या विद्वत्ताप्रचुर भाषणानंतर त्यांच्या अनौपचारिक गप्पा ऐकणे हा एक अनोखा श्रवणानुभव असायचा.

एकदा दत्तोपंतांना घरी जेवावयास बोलावले. दिवसभराची बैठक संपल्यानंतरची निवांत

वेळ म्हणून रात्री दहाची वेळ ठरली. दिवसभराच्या दगदगीनंतरही जेवणाच्या टेबलावर दत्तोपंत सकाळच्या न्याहरीला बसावेत तसे ताजेतवाने ! बरोबर आलेल्या रमणभाई शहांनी त्यांना विचारले, "दत्तोपंत, हे सगळे कसं काय जमतं हो?" दत्तोपंतांनी किंचित स्मित केले आणि उत्तरादाखल एका ख्यातनाम फ्रेंच चित्रकाराचा किस्साच पेश केला. त्या फ्रेंच चित्रकाराने काढलेल्या, राजघराण्यातील पुरुषाच्या पोर्टेट चित्रामध्ये त्या गृहस्थाच्या पत्नीने काही सुधारणा सुचवली. ती त्याने लगेचच अमलात आणली. उत्कंठेने त्या पत्नीने चित्रकाराला विचारले, "किती वेळ लागला हो, हे सुधारायला?" चित्रकार उत्तरला, "चाळीस वर्षे !" तो त्याच्या कारकीर्दीचा एकूण कालावधी होता. आपली ही सहजताही अशीच कष्टसाध्य आहे हे दत्तोपंतांनी किती खुबीने सिद्ध केले!

पण दत्तोपंतांचे हे वैशिष्ट्यच होते. स्वत:चे चिंतन व सिद्धांत प्रस्तुत करतानाही ते जगभरातील विचारवंतांचे समान दृष्टांत आणि किस्से सादर करायचे. त्याबाबतीत मात्र दत्तोपंतांचा कोणी हात धरू शकेल असे वाटत नाही आणि याचा अनुभव प्रकट भाषण, छोट्या बैठका आणि व्यक्तिगत अनौपचारिक गप्पा अशा सर्व प्रसंगी यायचा. जितक्या अस्खलितपणे ते एखाद्या पाश्चात्य पंडिताची वाक्ये उद्धृत करायचे तितक्याच सहजतेने संतसाहित्य प्रसृत करायचे. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत - भाषा कोणतीही असो किंवा श्लोक, कविता, निबंध, विनोद - साहित्य प्रकार कोणताही असो; दत्तोपंत सर्वात सारख्याच कसबाने विहार करत. त्यांची उपस्थिती म्हणजे ज्ञानगंगेतील अवगाहन ! या गंगौघामध्ये सगळे लेखक-दार्शनिक, संत यांचे प्रवाह असत-नसायचा फक्त 'ठेंगडी प्रवाह !'

एका बैठकीत एका कार्यकर्त्याने, सध्याचे तरूण प्रचारक व दत्तोपंतांसारखे ज्येष्ठ प्रचारक यांच्या व्यासंगाची व क्षमतेची तुलना करताच, दत्तोपंत वदले, "अहो तुम्ही करीत असलेली, इतक्या वर्षांचे अनुभवी प्रचारक व आजकालचा अननुभवी प्रचारक यांची तुलनाच अव्यवहार्य आहे. मी जेव्हा नुकताच प्रचारक निघालो होतो, त्यावेळच्या माझ्याकडे बघावयास हवे होते." त्यांचे हे उत्तर, सर्वांना बरेच काही सांगून गेले असले तरी मला मात्र, 'विद्या विनयेन शोभते।' या विधानाच्या वस्तुपाठाचे दर्शन घडले.

**सुयोग्य शब्दांचे आग्रही उपयोजक**

"माझ्या म्हणण्याचा शब्दश: अर्थ घेऊ नका. त्यामागील भाव व विचार लक्षात घ्या." असे म्हणण्याची सर्वसामान्य व्यक्तीवर अनेक वेळा पाळी येते. निर्ढावलेले

राजकारणी तर यापुढे जाऊन, "मी असे म्हटलेच नव्हते." किंवा "माझ्या बोलण्याचा विपर्यास केला आहे." असे सांगून मोकळे होतात. खरंतर 'शब्द' हे आपले भाव व विचार समोरच्यांपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम असेल तर शब्द आणि भाव वा विचार यांची फारकत होईलच कशी? म्हणूनच समानार्थी वाटणारे अन्य शब्द उपलब्ध असताना, एखाद्या इंग्रजी शब्दाचा अनुवाद शक्य असतानासुद्धा दत्तोपंत, आपण वापरलेल्या शब्दांबद्दल आग्रही असत.

सर्व प्रकारच्या विविधतेबद्दल ख्यातनाम असलेल्या हिंदू विचाराचा उल्लेख Hinduism या शब्दाने करणे दत्तोपंतांना कधीच स्वीकारार्ह वाटले नाही. 'इझम' या शब्दातील अभिप्रेत असलेली एक देव, एक धर्मग्रंथ, एक उपासनापद्धती ही संकल्पना हिंदू जीवन विचाराला मान्य नाही; उलट हिंदुत्व ही एक 'जीवनपद्धती' आहे. त्यामुळे हिंदुत्वाला प्रतिशब्द 'हिंदुत्व' हाच व त्याचा अनुवाद Hinduism असा न करता Hinduness असाच करावा लागेल हे दत्तोपंतांचे तत्संबंधीचे विवेचन ऐकले की 'धर्म' शब्दाचे भाषांतर Religion असे करू दिल्यामुळे झालेल्या ब्रह्मघोटाळ्याचे आकलन होते.

Genuine Trade Unionism हा शब्द प्रयोगही असाच ! भारतीय मजदूर संघाचा उदयच मुळी इंटक-आयटकच्या ऐन उमेदीच्या काळातला ! त्याकाळी (आणि खरं म्हणजे आजही) कामगार संघटना म्हणजे कामगारांच्या मागण्यांसाठी मालकांशी संघर्ष करण्याचे अस्त्रच ! अशा संघर्षात देश व समाज वेठीला धरला गेला तरी पर्वा नाही अशी परिस्थिती ! या पार्श्वभूमीवर 'कामगार हा सुद्धा समाजाचा एक जबाबदार घटक आहे व समाजबांधणीत आणि राष्ट्र पुनर्निर्माणाच्या कार्यात त्यांचाही सहभाग असला पाहिजे. त्या दृष्टीने समाजहिताच्या आड कामगारांचे हित येत असेल तर ते बाजूला सारले पाहिजे' हा विचार रुजविणे म्हणजे विरूद्ध धुव्रावरील विचार मांडणे! त्यामुळेच प्रचलित कामगार चळवळ व भारतीय मजदूर संघ यातील फरक स्पष्ट करण्यासाठी, प्रचलित चळवळीसाठी Bread & Butter Unionism आणि आपल्यासाठी Genuine Trade Unionism अशा शब्दावली दत्तोपंतांनी रूढ केल्या.

शब्दाचे सुयोग्यपण, त्याने ध्वनित होणाऱ्या अर्थाच्या नेमकेपणाशी संबंधित असेल तर, 'दैवतापासून ज्याला विभक्त करता येत नाही तो भक्त!' असे दत्तोपंतांनी केलेले

भक्ताचे वर्णन किती समर्पक वाटते, नाही?

'वापरलेला शब्दच त्या त्या ठिकाणी योग्य आहे. अन्य कोणताही समानार्थी शब्दसुद्धा अर्थाची छटा बदलेल' असे ज्याच्यासंबंधी म्हणता येईल तो 'शब्दप्रभू'! त्या अर्थी दत्तोपंत शब्दप्रभू ठरतील.

**नेमके निदान करणारे व्यासंगी चिकित्सक**

रोगाच्या मुळाशी जाऊन, त्याचे अचूक निदान करणारा वैद्यच खऱ्या अर्थाने 'चिकित्सक' या बिरुदाला शोभा आणतो. अशा चिकित्सकाचा व्यासंग जेवढा दांडगा, तेवढा त्याच्या निदानातला नेमकेपणा अधिक ! सामाजिक रोगांचे असेच अचूक निदान करणारे दत्तोपंत ठेंगडी एक व्यासंगी चिकित्सक होते.

स्वातंत्र्योत्तर काळात दलितांचा प्रश्न सुटण्याऐवजी, दिवसेंदिवस उग्रच बनत चालला आहे. एकाच समाजातील विविध घटकांमधील विषमता ही एक विकृती आहे, रोगाचा तो प्रादुर्भाव आहे. तर अशा विषमतेची अस्पृश्यतेत झालेली परिणती ही समाजाला लांछनास्पद आहे आणि अशा तथाकथित अस्पृश्यांवर होणारा अन्याय तर अमानवीय गुन्हा आहे. हे सर्व तेव्हाच थांबेल, जेव्हा मुळातली विषमता संपून त्याची जागा 'समता' घेईल. पण असा समतायुक्त समाज कसा निर्माण होणार? आणि निर्माण झाला तरी टिकणार कसा? अस्पृश्यतेच्या विषवल्लीचे मूळ आहे, उच्च-नीचतेच्या भावनेत ! आणि ती रूजली आहे तथाकथित सवर्णांच्या मनात ! तिथून ती भावना कशी हटवता येईल? परस्परांविषयीचा बंधुभाव व त्यावर आधारित परस्परांच्या सुखदु:खाशी समरस होण्याची मानसिकता याखेरीज ते कसे शक्य आहे? या मूलगामी चिंतनातूनच दत्तोपंतांनी एक शब्द रूढ केला, 'समरसता'! 'समरसतेशिवाय समता अशक्य !' हे विधानही त्यामुळेच नेमक्या निदानाचे द्योतक नाही का?

स्वदेशी धोरणासंदर्भात साशंक असलेल्या व स्वाभिमान हरवलेल्या समाजाला उद्देशून दत्तोपंतांनी सांगितलेला, अलीकडच्या इतिहासातील किस्साही असाच मार्मिक, रोगाचे नेमके निदान करणारा व रोग्याचा आत्मविश्वास जागविणारा म्हणावा लागेल. 'यापूर्वी झालेल्या आंतरराष्ट्रीय व्यापारी कराराचे काय? तो मोडला तर आपल्या विश्वासार्हतेचे काय?' अशा संदेहाच्या उत्तरादखल दत्तोपंतांनी बारा-पंधरा वर्षांपूर्वीचा जो किस्सा सांगितला त्याचा आशय असा - 'जपान व अमेरिका परस्पर व्यापारी कराराने बांधले गेले

होते. एका वर्षी कॅलिफोर्नियामध्ये संत्र्यांचे अमाप पीक आले. अमेरिकेने कराराचा आधार घेऊन, जपानच्या गळ्यात संत्री मारली.' हे सर्व सांगून दत्तोपंत गरजले, "The Japanese markets were flooded with Californian oranges but not a single orange was sold. याला म्हणतात 'स्वदेशी प्रेम'! स्वदेशाचे प्रेम हा प्रखर राष्ट्रभक्तीचा आविष्कारच आहे." ह्या परती नेमकी चिकित्सा ती काय करणार?

**संघटन शास्त्राचे भाष्यकार**

अशाप्रकारे, समाजाच्या नाडीवर बोट असलेले दत्तोपंत संघटन शास्त्राचे सखोल अभ्यासक व मौलिक चिंतक होते. स्वाभाविकच संघटन शास्त्रावर भाष्य करण्याचा त्यांचा अधिकार निर्विवाद होता. अगदी साध्या वाटणाऱ्या, छोट्या छोट्या गोष्टी चपखल शब्दात आणि पटेल अशा दृष्टान्तांच्या व उपमांच्या आधारे समजावून सांगण्यात दत्तोपंतांचा हातखंडा होता. १९८० च्या जानेवारी महिन्यात, पुणे येथे झालेल्या पाच दिवसीय अभ्यासवर्गात, दत्तोपंतांनी केलेल्या दहा मार्गदर्शनपर व्याख्यानांचे संकलन 'विचार सूत्र' या नावाने प्रकाशित झाले आहे. हा ग्रंथ म्हणजे संघटनशास्त्रावरील 'गीता' म्हणता येईल. काही मोजक्याच उदाहरणांवरून वरील विधानाची सत्यता पटेल.

कोणत्याही संघटनेच्या कार्यकर्त्याला, संघटनेच्या ध्येय-धोरण कार्यपद्धतीची हळूहळू उकल होत असते. सर्वच गोष्टी काही Blue Print च्या रूपात उपलब्ध नसतात. त्यासंबंधीच्या प्रक्रियेला दत्तोपंतांनी Progressive Unfoldment असे नाव दिले. स्थानिक कार्यकर्त्यांना खूपदा केंद्रस्थानी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांची पार्श्वभूमी, अनिवार्यता व त्यांचे दूरगामी परिणाम यासंबंधीची माहिती नसते; तर केंद्रातील अधिकाऱ्यांना स्थानीय कार्यकर्त्यांच्या अडचणी व मर्यादा यांची अनेकदा जाणीव नसते. अशा परिस्थितीत ठरलेली योजना सफल होतच नाही; उलट, गैरसमजावर आधारित परस्पर अविश्वासाचे वातावरण मात्र निर्माण होते. हे सर्व टाळण्यासाठी Two way communication हवे असते, उपर से नीचे और नीचे से उपर ! 'कार्यकर्त्याने प्रत्येक घटनेकडे, योजनेकडे, कार्यक्रम उपक्रमाकडे कसे पाहावे?' दत्तोपंत सांगतात "तात्कालीक व दूरगामी अशा दोन्ही परिणामांच्या निकषावर प्रत्येक गोष्टीचा विचार व्हावा" आणि अशा दृष्टीकोनाला नाव देत, 'Bi-focal vision!'

दत्तोपंतांचे संघटकाचे जीवन सुमारे सहा दशकांचे ! या काळात, त्यांनी 'कार्यकर्ता'

या संघटनेच्या प्रमुख घटकाचे केलेले विवेचन 'कार्यकर्ता' या नावाच्या सुमारे तीनशे पानी ग्रंथात संकलित केले आहे. त्यातला शब्द न् शब्द, दत्तोपंतांच्या या विषयावरील अधिकाराची साक्ष आहे.

**हाडाचा कार्यकर्ता**

दत्तोपंतांनी कार्यकर्ता व संघटना यासंबंधी केलेले विश्लेषण त्यांच्या या विषयावरील अधिकाराची साक्ष पटवते तर त्यांचा व्यवहार, त्यांनी केलेल्या विश्लेषणानुसार ते जीवन जगत असल्याचा हृद्य आविष्कार घडवितो. कथनी व करनी यांची अशी एकरूपता खरोखरच दुर्मिळ असते.

अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या बैठकीप्रसंगी दत्तोपंतांचे घडणारे दर्शन विलोभनीय असेच असे. दिवसाच्या चोवीस तासांपैकी झोप व विश्रांतीचा वेळ सोडला तर बाकी सर्व वेळी दत्तोपंत कार्यकर्त्यांच्या गराड्यातच दिसत. मग ती वेळ न्याहरी-भोजनाची असो, सायंकाळी शाखेनंतरची असो, नाहीतर, रात्री सर्वजण झोपी गेल्यानंतरची मध्यरात्रीपर्यंतची असो ! फरक असलाच तर वेषात ! कधी धोतर-झब्बा असेल तर कधी अर्धी खाकी निकर व कोपरी, तर कधी धोतर कोपरी ! खांद्यावर असलेला टॉवेल-गमछा हा मात्र सर्व वेळी हवाच ! त्यामुळे ज्याठिकाणी कार्यकर्त्यांचा घोळका दिसेल व कोणाच्यातरी खांद्यावर गमछा दिसेल, तिथे दत्तोपंत आहेत असे समजावे. एखादी व्यक्ती माणूसवेडी असते - दत्तोपंत 'कार्यकर्ता वेडे' होते. रामायणात एक मजेदार प्रसंग असल्याचे कोणीतरी सांगितले होते. एकदा म्हणे रामभक्त हनुमानाच्या मनात आले -'आपले आराध्यदैवत असलेल्या प्रभू रामचंद्रांचे दैवत कोणते असेल?' त्यांनी एकदा प्रभू रामचंद्र ध्यानमग्न असता पाहिले, तर प्रभू राम हनुमानाच्या मूर्तीसमोर ध्यानस्थ बसले होते. असंख्य कार्यकर्त्यांना दैवतासमान वाटणारे दत्तोपंत स्वत: मात्र कार्यकर्त्यांचे भक्त होते - कार्यकर्त्यांपासून कधीही विभक्त न होणारे भक्त !

मागे एकदा दत्तोपंतांकडून ग्रीक पुराणातील एक कथा ऐकली होती. कथा होती एका योद्ध्याची-जमिनीवर पाय असेपर्यंत अजेय अशी शक्ती असणाऱ्या योद्ध्याची ! त्या योद्ध्याचे वर्णन दत्तोपंतांनाच तंतोतंत लागू पडते. आकाशाला स्पर्श करण्याएवढी प्रतिभा, क्षमता व उंची लाभलेल्या दत्तोपंतांचे पाय मात्र जमिनीपासून कधीच सुटले नाहीत आणि तेच दत्तोपंतांचे खरे सामर्थ्य होते. दत्तोपंत कितीही मोठे चिंतक, कितीही प्रतिभासंपन्न नेता असले तरी हाडाचे ते कार्यकर्तेच होते.

## सर्जक कार्यकर्ता

जेव्हा दत्तोपंतांना 'राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार' मिळणार ही घोषणा झाली तेव्हा एक जण म्हणाला, ''मालक विरूद्ध मजूर असा संघर्ष पेटविणाऱ्या, कारखानदार विरुद्ध कामगार अशी समाजात फूट पाडणाऱ्या युनियन लीडरला एकात्मता पुरस्कार हा विसंगतीजन्य विनोदच नाही का?''

हे वाक्य ऐकले अन् विचार करू लागलो. दत्तोपंत एक युनियन लीडर जरूर आहेत; पण या कार्यामागची त्यांची प्रेरणा कोणती? या कार्याचे लक्ष्य कोणते? विचारासरशी मला अल्प परिचित असलेला दत्तोपंतांचा कर्तृत्वपट नजरेसमोरून सरकू लागला. त्यातच जाणवले, 'दत्तोपंत दर्शनिक, तत्त्वचिंतक, लीडर- कोणीही असले तरी मूळ कार्यकर्ताच होते - एक सर्जक कार्यकर्ता !' 'एक दीप दुसऱ्यास चेतवी' या न्यायाने त्यांनी अनेक कार्यकर्ते निर्माण केले आहेत आणि त्यांच्या मदतीने अनेक संस्था-संघटना जन्माला घातल्या आहेत. भारतीय जनसंघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, सामाजिक समरसता मंच, स्वदेशी जागरण मंच हा आहे त्यांचा सृजनाचा आलेख! सर्व संस्था किती परस्पर भिन्न! परिभाषा भिन्न, कार्यपद्धती भिन्न, मार्ग भिन्न...पण अंतिम लक्ष्य एकच 'राष्ट्र पुनर्निर्माण' व त्यासाठी एकता एकरस समाजनिर्माण! एकाच उद्दिष्टाकडे जाणाऱ्या अशा भिन्न प्रकृतीच्या देशव्यापी संघटना निर्माण करणे, त्यांना योग्य वैचारिक बैठक देणे, अनुरूप कार्यपद्धती विकसित करणे हे समाज जीवनाचा समग्र व एकात्म पद्धतीने विचार केल्याखेरीज शक्य तरी आहे का? मग असा एकात्म विचार करणारे दत्तोपंतच 'राष्ट्रीय एकात्मता पुरस्काराचे' खरे अधिकारी नाहीत का?

# मला उमजलेले दत्तोपंत

*सौ. विद्या श्रीकांत धारप*

दत्तोपंतांची आमच्या घरी ये-जा केव्हा सुरू झाली हे निश्चित आठवतही नाही. त्याकाळी कधी रमणभाई शहांकडे, कधी मनहरभाई मेहतांकडे तर कधी आमच्याकडे राहणे होत असे. ही दोन्ही घरे आता नसल्यामुळे ते आमच्याचकडे उतरत. या काळात ते आमच्याकडे अनेक वेळा उतरले असतील. ते मोजणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. कारण ते आमच्या घरातलेच एक घटक आहेत. आमचं सारंच घर त्यांनी आपलंसं केलेलं होतं आणि तेसुद्धा अगदी सहजपणे.

मागे एकदा ते यायचे ठरले असताना घरात रंगकाम चालू होतं. वावरायला जेमतेम स्वयंपाकघर होतं. बाकी सगळ्या खोल्यांमध्ये रंगकाम तरी चाललं होतं, नाहीतर सामान तरी रचलेलं होतं. अशा एका खोलीच्या घरातसुद्धा दत्तोपंतांना राहण्यात अडचण झाल्यासारखे वाटले नाही.

संध्याकाळच्या जेवणाला सर्वांनी बरोबर बसण्याचा त्यांचा आग्रह असे. मीसुद्धा वाढायला म्हणून थांबलेलं त्यांना चालत नसे. जेवताना शेवटच्या माणसाचे जेवण होईपर्यंत ते पानावर बसून असत. सगळं सांभाळूनसुद्धा कधीतरी मला जेवावयास मागेपुढे होते. अशा वेळी माझं जेवण होईपर्यंत माझ्याशी गप्पा मारत ते स्वयंपाकघरातच फेऱ्या मारत असत.

धारपांचं घर हे त्यांचं आपलं घर झालं होतं. त्यामुळेच कोणीही आल्या-गेल्याला प्रथम ते चहापाणी विचारत. यात त्यांचा आदरातिथ्याचा भाग तर होताच परंतु या घराला आपलं घर म्हणून स्वीकारल्याचं ते लक्षण होते.

आमच्या सगळ्या गप्पांमध्ये घरगुतीपणा हा स्थायिभाव असे. अशा गप्पांमध्ये कोणाला काही विचारणे किंवा त्याने सांगितले तर ते ऐकून घेणे यात त्यांना कधीच कमीपणा वाटला नाही. 'बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्' ही त्यांची विद्यार्थी मनोवृत्ती नेहमीच अनुभवाला येत असे.

एखाद्या संस्थेची खरी ओळख त्या संस्थेची घटना वाचून जितकी होत नाही तितकी त्या संस्थेचे प्रतिनिधी कार्यकर्ते पाहून होत असते असे म्हणतात. भारतीय मजदूर संघ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांची खरी ओळख मला दत्तोपंतांच्या सहवासातून झाली.

**कर्मकठोरता**

रामजन्मभूमी आंदोलनाचे दिवस होते. दत्तोपंत घरी आलेले असताना त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी ठेवले. दत्तोपंत आंघोळ करून बाहेर आल्यावर लक्षात आले की गरम पाणी तसेच. दत्तोपंतांना त्यासंबंधी विचारले असता दत्तोपंत म्हणाले, अयोध्येला कदाचित सत्याग्रह होईल, तुरुंगात जावं लागेल, तिथे कोण गरम पाणी देणार? त्याची सवय करतोय. अयोध्येत तुरुंगवास घडला नाही तरी अयोध्येच्या मुक्कामात दत्तोपंतांनी कधी गरम पाणी वापरले नाही. आणि हेसुद्धा वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेली असताना. कार्यकर्त्याला किती कर्मकठोर व्हायला लागतं याचं हे उत्तम उदाहरण नाही का?

तसं पाहिलं तर त्यांच्या कर्मकठोरतेची कितीतरी उदाहरणं आहेत. काही उदाहरणे माझे पती श्रीकांत धारप यांच्या बोलण्यातून कळली. १९७२-७३ ची गोष्ट असावी. मुंबईमध्ये भारतीय मजदूर संघाचा मोर्चा होता. १२ कि.मी चालणं होतं. दत्तोपंतांनी ते इतर कार्यकर्त्यांच्या समवेत सहजपणे पार पाडले.

दत्तोपंतांना ६० वर्षे पूर्ण झाली. कार्यकर्त्यांनी विचार केला. त्यांचे षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ करावेत व त्या निमित्ताने निधी संकलित करावा. संस्थेला लागणाऱ्या निधीसंदर्भात दत्तोपंतांची आडकाठी नव्हती. आक्षेप होता तो षष्ट्यब्दीपूर्तीच्या समारंभाला. अर्थातच दत्तोपंतांची एकसष्टी समारंभपूर्वक साजरी झालीच नाही. एवढेच नव्हे तर पुढच्याच वर्षी भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनात कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा नेत्याची एकसष्टी साजरी करायची नाही असा ठराव मंजूर करण्यात आला.

**मातृहृदयी कार्यकर्ता**

ज्येष्ठ कार्यकर्ता म्हणून दत्तोपंतांचे हृदय हे मातृहृदय आहे असे म्हणावेसे वाटते. दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. दिल्ली येथे भारतीय मजदूर संघाचा मेळावा होता. वेळ दुपारची होती. एप्रिलमधलं उन्ह 'मी' म्हणत होते. कार्यकर्ते सगळे उन्हात भाजून निघत होते. मंचावर स्वाभाविकपणे छप्पर होते. उन्हातल्या कार्यकर्त्यांकडे पाहून दत्तोपंतांनी व्यासपीठावरीलसुद्धा छप्पर काढायला लावले. अशी कृती मातृहृदयाखेरीज शक्य आहे का?

आणीबाणीच्या काळात संघर्ष समितीचे कार्यवाह रवींद्र वर्मा हेही दत्तोपंतांसमवेत आमच्याकडे येत. त्यांची तब्येत बरी नव्हती. दत्तोपंत एवढे मोठे अधिकारी असूनसुद्धा एखाद्या परिचारिकेसारखी वर्मांची काळजी घेत होते. त्यावेळी माझे पतीही तुरुंगात होते. पुढे रवींद्र वर्मांना अटक होऊन ते तुरुंगात गेल्यावर दत्तोपंतांनी धारपांना निरोप पाठविला, 'रवींद्र वर्मांच्या तब्येतीची काळजी घ्या.'

मुंबईचे एक कार्यकर्ते अशोक भिडे दत्तोपंतांसाठी काही लेखन करीत. दत्तोपंतांनी त्यांना या कामासाठी दिल्लीला बोलाविले. त्याप्रमाणे भिडे गेले. दिल्लीला पोहोचण्याची त्यांची वेळ होती रात्रीची. त्यावेळी त्यांना कार्यालय सापडेल की नाही, काही त्रास तर होणार नाही ना या काळजीने दत्तोपंतांनी आपले सहकारी रामदास पांडे यांना स्टेशनवर भिडे यांना आणण्यासाठी पाठविले.

दत्तोपंत आजन्म ब्रह्मचारी. पण कुटुंबवत्सल कार्यकर्त्यांची कशी काळजी घ्यावी याचं उत्तम उदाहरण म्हणजे आमची दिल्ली वारी. दत्तोपंतांच्या सांगण्यावरून आम्ही सहकुटुंब दत्तोपंतांच्या घरी उतरलो. घर म्हणजे काय ब्रह्मचाऱ्याची मठी. त्यातून दत्तोपंत सतत भेटीगाठी, बैठका यात व्यग्र. पण आमची सर्व प्रकारची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांनी रामदास पांडे यांच्यावर सोपविली होती. आमच्या पाच दिवसांच्या मुक्कामापैकी पांडे यांना सांगून एक दिवस मुद्दाम आपल्या कार्यक्रमात आवश्यक ते बदल केले व आमच्यासाठी काही वेळ राखून ठेवला. एवढंच नव्हे, त्या दिवशी आम्हा सगळ्यांना कॅनॉट प्लेस येथील एका वातानुकूलित हॉटेलमध्ये जेवायला घेऊन गेले. अशा एक ना दोन कित्येक घटना दत्तोपंतांच्या मातृहृदयाची साक्ष देतात.

**व्यवहारातील बारकावे**

कार्यकर्ता म्हणून किती बारीकसारीक गोष्टींचा विचार करावयाचा असतो ते दत्तोपंतांकडूनच शिकावे. ते सांगतात, कोणाकडे गेलो असताना घराची दारं-खिडक्या नेहमी उघडी ठेवावीत. व्यवहारातील पारदर्शकतेसाठी केवढी ही काळजी !

एकदा रमणभाई शहा यांच्या आजारी पत्नींना भेटावयास रुग्णालयात जायचे होते. त्या दिवशी आवर्जून आणि आग्रहाने मला ते बरोबर घेऊन गेले. एखाद्या आजारी महिलेला तब्येतीची विचारपूस करण्यासाठी आपल्यासारखीच दुसरी महिला आली आहे, तीही एका कार्यकर्त्याची पत्नी, हे पाहिल्यावर किती विलक्षण परिणाम होत असेल.

माझ्या सासूबाईंना वाचनाचे वेड होते म्हणा ना ! त्या 'दासबोध' अगदी सखोलपणे वाचत असत. मध्यंतरी त्यांना अस्वस्थता वाटू लागली. दत्तोपंतांच्या ते लक्षात आलं. पण त्या कोणत्याही गोष्टीचा उल्लेख न करता दत्तोपंत त्यांना म्हणाले, 'आई, तुम्ही दासबोध वाचता ना, मग मला त्याच्या प्रत्येक समासाच्या काही निवडक सारभूत ओव्या लिहून द्याल ? माझ्या चिंतनात त्याचा उपयोग होईल.' हे काम झाल्यावर दत्तोपंतांकडे दुसरे काम तयारच होते. दत्तोपंतांनी त्यांना दासबोधात 'कार्यकर्ता' या विषयावर जे जे श्लोक आहेत ते लिहावयास सांगितले, पण हे सर्व केवळ सांगून ते थांबले नाहीत तर त्यांनी ते सारं स्वतः लिहून घेतलं. त्याचा वापर केला. हे सगळं पाहून सासूबाईंना किती समाधान वाटलं असेल याची कल्पनाच केलेली बरी.

सामाजिक संघटनांमध्ये कित्येक वेळेला काही निराशा पदरी येते, कधीतरी एखाद्या कार्यकर्त्यांशी वाद-विवाद होतो, त्याचा मनस्ताप होतो, कामातून थांबण्याची इच्छा प्रबळ होते. अशा वेळी त्या कार्यकर्त्याला मन मोकळे करण्याचं स्थान म्हणजे दत्तोपंत! आणि दत्तोपंतांचं त्याला सांगणं, 'अरे माझ्यावरही असे प्रसंग कधी आले असतील असे वाटत नाही ? एकेक सांगत बसलो तर रात्र पुरणार नाही. पण तुला सांगतो, कार्यकर्त्याला नेहमी अशा कित्येक गोष्टी सोडून द्याव्या लागतात. खरं म्हणजे 'मुलीच्या आईची' भूमिका बजावावी लागते.'

असे मातृहृदयी दत्तोपंत कार्यकर्ता म्हणून नेहमीच Unattached involvement चा पुरस्कार करत. कार्यकर्त्याने पूर्णपणे झोकून देऊन काम केले पाहिजेच. त्या दृष्टीने त्याची involvement महत्त्वाची. पण प्रसंगी त्यातच गुंतून न राहता, दूरसुद्धा होता आले पाहिजे. याला म्हणता येईल Unattached involvement. असे हे तत्त्व केवळ सांगण्यासाठी नसते तर आचरण्यासाठी असते हे दत्तोपंतांच्या स्वतःच्या व्यवहारातून सिद्ध होते. माझ्या मुलीचे, अनघाचे लग्न होते. दत्तोपंत दोन दिवस आधी हजर होऊन सर्व विधी समारंभांमध्ये सहभागी झाले. पण कसे कोण जाणे लग्नाच्या दिवशी संध्याकाळीच त्यांची एक बैठक नागपूरला ठरवली गेली. दत्तोपंत लग्न झाल्या झाल्या स्वागत समारंभाला न थांबता विमानाने तडक नागपूरला रवाना झाले. वास्तविक स्वागत समारंभाला अनेक नामवंत कामगार पुढारी येणार होते. त्यावेळी दत्तोपंत असणं सोयीचेही होते. पण Unattached involvement आली ना!

असे हे दत्तोपंत केवढे महान व्यक्तिमत्त्व ! किती थोर मंडळींशी त्यांची घनिष्ठ मैत्री ! पण घरात आले की अगदी घरगुती कुटुंबीय.

दिवसभराचे श्रमाने दमून आले की रात्री झोपण्यापूर्वी एखादे पुस्तक वाचायला मागणार. तेही अगदी हलकेफुलके. त्यामुळे विनोदी पुस्तके, ॲगाथा ख्रिस्तीच्या कादंबऱ्या असं काहीही साहित्य त्यांना मनोरंजनासाठी चालत असे.

एकदा एका भाषणामध्ये त्यांना 'रंगसंगती' या विषयावर बोलायचे असावे. आमची अनघा कमर्शियल आर्टिस्ट. सकाळी न्याहरीच्या वेळेला त्यांनी याविषयी तिच्याशी चर्चा सुरू केली. थंड रंग, उष्ण रंग, त्याच्या संकल्पना, एक ना दोन अनेक विषय ! अनघा सांगेल त्याचं टिपण ते स्वतःच्या हस्ताक्षरात लिहीत होते आणि त्याचा आवश्यक तो उपयोग त्यांनी आपल्या भाषणात केला. दत्तोपंत हे खऱ्या अर्थाने आजन्म विद्यार्थी होते.

दत्तोपंतांना राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार मिळाला तेव्हा माझ्या मनात आले दत्तोपंतांना पुरस्काराची मिळणारी ही रक्कम रोख मिळाली तर बरे. नाहीतर चेक भरायला दत्तोपंतांचे बँकेत खाते तरी कुठे आहे? मागे एकदा अशाच एका लेखाचे मानधन धनादेशाने मिळाले आणि तेव्हा लक्षात आले दत्तोपंतांचे बँकेत खातेच नाही. एका अर्थी लाखोंचा हा पोशिंदा स्वतः मात्र निर्धन होता.

**(विश्व संवाद फीचर्स)**

# श्रद्धांजलीपर भाषण

**(श्री. मुकुंदराव गोरे यांचे दि. २३ ऑक्टोबर २००४ रोजी औरंगाबाद येथे झालेले भाषण)**

अनेकांनी दत्तोपंतांना जवळून पाहिलेले आहे. बऱ्याचदा त्यांचे भाषण ऐकलेले आहे. अत्यंत जवळून त्यांचा सहवास लाभलेले देखील अनेकजण येथे उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्या काही आठवणी सांगव्यात, काही अनुभव सांगावेत याची मला आवश्यकता वाटत नाही. त्याचप्रमाणे वेळोवेळी त्यांनी जे विचारधन सर्वांसाठी प्रकट केलेले आहे, त्यावर काही बोलण्याचाही मला अधिकार नाही. त्यामुळे आज नेमके काय बोलावे हा माझ्यापुढे प्रश्न आहे. दुसरीही गोष्ट आहे -गोंदवलेकर महाराजांनी असं म्हटलेलं आहे की, 'भगवंताचे नामस्मरण हा विषय एवढा मोठा आहे, इतका व्यापक आहे की सतत बोलत राहिला, कितीही बोलत राहिला तरी तो संपणार नाही आणि तो इतका अगाध आहे की तिथे प्रतिभा खुंटते, शब्द अपुरे पडतात, वाणी थबकते.' मा दत्तोपंतांना ज्यांनी जवळून पाहिलेले आहे, ऐकलेले आहे, अनुभवलेले आहे अशा सर्वांना, गोंदवलेकर महाराजांनी भगवंताच्या नामस्मरणाबद्दल जे म्हटले आहे ते कै. दत्तोपंतांना देखील लागू आहे असं जर मी म्हटले तर ती अतिशयोक्ती वाटणार नाही.

महाराष्ट्रातील जी वर्तमानपत्रे कायम संघसृष्टीच्या विरोधीच भूमिका घेतात त्यांनी देखील दत्तोपंतांची प्राणज्योत मालवल्यानंतर दत्तोपंतांवर लिहिलेले अग्रलेख आपण वाचले की दत्तोपंतांची महती आपल्या मनावर अधिकच बिंबेल. त्यांचे देहांतानंतर अनेक प्रतिभावंत कार्यकर्त्यांनी/सहृदयी लेखक/लेखिकांनी लिहिलेले अनेक लेख प्रकाशित झाले. आपल्यापैकी बहुतेकांनी त्यातील काही लेख वाचलेले असतील, त्यामुळे कै. दत्तोपंतांच्या बद्दल अधिक काही आठवणी सांगाव्यात असेही मला वाटत नाही.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे - दत्तोपंतांचा सार्वजनिक जीवनाचा प्रदीर्घ काळ, संपूर्ण भारत हे अत्यंत व्यापक कार्यक्षेत्र व त्यांनी उभ्या केलेल्या मजूर, किसान वगैरे अनेक संघटना व संस्था, त्यांचे बहुआयामी स्वरूप हे सर्व एक व्यक्ती - विशेषत:

माझ्यासारखी सामान्य व्यक्ती सर्वंकषपणे समजू शकत नाही. सात आंधळे व एक हत्ती अशी ही गोष्ट व्हायची.

कै. दत्तोपंतांचे जीवन एक गंगौघ होता. त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीजवळ घागर असेल तर घागरभर पाणी घेता येईल, तांब्या असेल तर तांब्याभर. माझ्याजवळ तर केवळ ओंजळ, त्यामुळे त्यांचे जीवनदर्शन मला अत्यंत अल्पसे झालेले आहे. सहवास खूप खूप लाभला. परंतु माझीच ग्रहण क्षमता अत्यल्प. त्यामुळे याप्रसंगी कुठून आणि कसे बोलावे हे मला नेमके कळत नाही. पण एकदम मला एका पत्राची आठवण झाली. छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर समर्थ रामदास स्वामींनी संभाजीराजांना लिहिलेल्या पत्राची. त्या पत्रात त्यांनी शिवाजीचे नाव लिहिलेले आहे. ते काढून तेथे दत्तोपंतांचे नाव घातले की माझे काम सुकर होईल असे मला वाटले आणि तेवढाच बदल करून मी त्या पत्राचे आपणास स्मरण करून देतो. शिवराय या शब्दाऐवजी पंत हा शब्द टाकला की काम झाले. स्वामी रामदासांच्या शब्दात बदल करून मी असे म्हणेन -

**आठवावे पंतांचे रुप । आठवावा पंतांचा प्रताप**

**आठवावा पंतांचा साक्षेप । भूमंडळी ।।**

दत्तोपंतांना ज्यांनी अनेक वर्षांपूर्वीपासून पाहिलेले आहे त्यांना हे माहिती आहे की त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत भारदस्त होते. उंचेपुरे दत्तोपंत प्रथमदर्शनी छाप पाडणाऱ्या व्यक्तीमत्त्वाचे होते आणि त्यांचा प्रताप खरोखरच काय वर्णावा ! श्रीपाद अमृत डांगे, बी.टी. रणदिवे अशा दिग्गज, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नेत्यांनी व्यापलेल्या क्षेत्रात शून्यापासून त्यांनी कार्याला सुरुवात केली. एकही सभासद नाही, एकही युनियन नाही येथून सुरुवात करून, कम्युनिस्ट पार्टीचे इंद्रजीत गुप्ता हे ज्यावेळी गृहमंत्री होते त्यावेळी त्यांना 'भारतीय मजदूर संघ' ही प्रथम क्रमांकाची संघटना आहे हे जाहीर करणे भाग पडले. दत्तोपंतांनी शून्यातून सृष्टी निर्माण केली. मजूर, किसान, ग्राहक, सहकार, स्वदेशी, पर्यावरण इ. समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांमध्ये महान कामगिरी करणाऱ्या दत्तोपंतांचे प्रतापी व्यक्तीमत्त्व इतिहासात नोंदले जाणारच. रामदासांनी दासबोधात जेथे जेथे 'साक्षेप' हा शब्द, ज्या अर्थाने वापरलेला आहे, त्याच अर्थाने या पत्रात देखील तो अभिप्रेत आहे. 'साक्षेप' या शब्दात पाच महत्त्वपूर्ण संकल्पनांचा एकत्रित समावेश आहे. त्या संकल्पना म्हणजे एक-निश्चित ध्येय - निश्चित उद्दिष्ट, दोन - त्या ध्येयाकडे, उद्दिष्टाकडे जाणाऱ्या

भिन्न भिन्न मार्गांपैकी एका मार्गाची निवड व स्पष्टता, तीन-त्या मार्गावरून घालण्याची तीव्रतम इच्छा आणि दृढ निर्धार - हा दृढनिर्धार किती ? श्री गुरुजींनी संघावरील पहिल्या बंदीच्यावेळी सर्व स्वयंसेवकांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात जे म्हटले आहे की 'आगे, और आगे और आगेही बढना है । संकट, बाधाएँ, कभी स्वजनोद्वाराही द्रोह, सभी सहना है ।' आपल्याच लोकांकडून विरोध झाला तरी ध्येयपथावरुन मी मागे हटणार नाही. हा निर्धार अशी तीव्रतम इच्छा, चार - ध्येयपूर्तीचा प्रत्यक्ष कृती कार्यक्रम आणि पाच - ध्येयसिद्धी मी करीनच करीन असा 'विजय विश्वास'. अशा पाचही संकल्पना म्हणजे साक्षेप - कै. दत्तोपंतांचा साक्षेप असा होता, त्या साक्षेपाचा आठव अपेक्षित आहे. कम्युनिस्टांच्या क्षेत्रात शिरुन, शून्यातून संघटना सुरू करायची व कम्युनिस्ट गृहमंत्री श्री. इंद्रजीत गुप्ता यांना हे जाहीर करायला लावायचं की भा.म.संघ ही पहिल्या क्रमांकाची संघटना आहे हा साक्षेप. समर्थ रामदासांच्या पत्राच्या दुसऱ्या ओवीत थोडा बदल करुन आपण असं म्हणू या की -

**पंतांचे कैसे बोलणे ।**
**पंतांचे कैसे चालणे ।**
**पंतांची सलगी देणे । कैसे असे ?**

दत्तोपंत शेकडो, हजारो कार्यकर्त्यांच्या घरी राहिलेले आहेत. त्या घरा-घरातील कुटुंबीय आई, वडील, पत्नी, मुले, मुली इ. दत्तोपंतांची सलगी देणे कसे असे याच्या कितीतरी आठवणी सांगतात, सांगतील. दत्तोपंतांचे बोलणे-चालणे कसे होते ? ते त्यांनी प्रयत्नपूर्वक घटविले होते काय ? त्यांच्या तरुणपणीच ते 'How to win friends' सारखी डेल कार्नेजीची सर्व पुस्तके कोळून प्यायले होते आणि मॅनेजमेंट सायन्सचा गुरू पिटर ड्रकर यांची अगदी अलीकडची पुस्तकेही त्यांनी वाचलेली असत. पण पाश्चिमात्यांचे अनुकरण करण्याची त्यांना काहीच गरज नव्हती. कारण ही सर्व पुस्तके 'चांगले दिसावे कसे ?' यावर जोर देणारी, यावर मार्गदर्शन करणारी. भारतीय संत महंतांची शिकवण, ऋषीमुनींची शिकवण ही 'स्वत: चांगले असावे कसे ?' हे शिकविणारी स्वत: जर चांगले असू तर चालणे बोलणे अगदी योग्यच होईल. म्हणून अंत:करण शुद्ध करण्यावर, मन स्वच्छ करण्यावर आपल्या ऋषीमुनींचा, संत महंतांचा भर. पाश्चात्यांचा जोर बाह्य गोष्टींवर. त्यांचे सूत्र काय ?

Sow the action and reap the habit

Sow the habit and reap the character

तुमचा स्वभाव चांगला होण्यासाठी - चांगली कृती पेरा, त्यातून तुम्हाला चांगल्या सवयी जडतील. चांगल्या सवयी पेरा, तुमचा स्वभाव चांगला होईल. भारतीय आध्यात्म सांगते, 'स्व' ओळखा, म्हणजे तुमचा 'स्व' आणि इतरांचा 'स्व' एकच आहे हे तुम्हाला कळेल आणि तुमचा व्यवहार - चालणे बोलणे योग्य होईल. हा फरक फार महत्त्वाचा आहे.

रिसेप्शनिस्टने हसतमुख असावे, आलेल्यांचे स्वागत करावे याचे तिला ट्रेनिंग दिलेले असते. मोठ मोठ्या कॉर्पोरेट ऑफीसमध्ये तुम्ही जा. तुमचे स्वागत होईल पण त्याचवेळी त्या स्वागतिकेस सांगितलेले असते की शक्यतर बहुतेकांना बाहेरच्या बाहेरच कटवा - व्यवस्थापनापर्यंत पोहोचू देऊ नका. त्यामुळे ती कितीही गोड हसली व मधूर बोलली तरी आपल्याला कळते की आपल्याला बाहेरचा दरवाजा दाखविणार आहे. कारण तिच्या सबकॉन्शस माईंडमध्ये वरिष्ठांच्या सूचना आहेत. या उलट भारतीय आध्यात्म, जे एकत्वाची शिकवण देते ते मा. दत्तोपंतांनी ग्रहण केलेले होते. त्यामुळे त्यांचा व्यवहार कसा असे? त्यांचे चालणे, बोलणे कसे असे ? अशा विभूती स्वागत कसे करतात, बोलतात कशा? याचे सुरेख वर्णन श्री ज्ञानेश्वरांनी केलेले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात -

**पुढां स्नेह पाझरे । मागा चालती अक्षरें । शब्दपाठी अवतरे । कृपा आधि ॥**

एखादा कार्यकर्ता भेटायला आला की संपूर्ण शरीरावर, चेहऱ्यावर आत्मीयतेचे, स्नेहाचे भाव - स्नेह ओथंबून वाहतो आहे आणि त्यामुळे येणाऱ्यास या स्नेहाची प्रचिती होते. त्यानंतर 'या, या बसा ना' हे शब्द. पुढां स्नेह पाझरे । मागा चालती अक्षरे - आपण खुर्चीत बसलो, पंखा चालू केला किंवा त्याचा स्पीड वाढवला गेला, उन्हातून आपण आलेलो आहोत याची दखल घेण्यात आलेली आहे, स्थानिक कार्यकर्त्यांनी पाण्याचा ग्लास दिलेला आहे. कृपा आधि आणि शब्द नंतर. 'दिल्लीत केव्हा आलात?' शब्द पाठी अवतरे। कृपा आधि. आपण म्हटले कालच दिल्लीत आलेलो आहोत. हा स्नेह संपूर्ण वागण्या बोलण्यात केव्हा पाझरतो ? लग्न झालेली मुलगी प्रथमच माहेरी आलेली आहे. घरातील आजी, आजोबा, आई, वडील, भाऊ, बहीण या सर्वांची स्वागताची उत्सुकता ती माहेरवाशीण अनुभवते. कारण हा स्नेह, ही आत्मीयता प्रथम सर्वांच्या मनात असते.

दत्तोपंतांच्या मनातच, अंत:करणातच ही आत्मीयता असे. त्या आत्मीयतेची प्रचिती कार्यकर्त्यांना येत असे. नंतर व्यवहार कसा असे ? 'तव बोलणेचि नाही । बोलो म्हणे जरी कांही । तरि बोल कोणाही । खुपेल कां ? हा कार्यकर्ता दिल्लीत आला आहे म्हणजे कांही काम घेऊनच आलेला असेल ना ? त्यामुळे ते काम काय ? हे समजून घ्यायचे आहे. पण दत्तोपंत ते विचारीत नाहीत. आपण कसे वागतो. एखादा कार्यकर्ता खूप दिवसांनी कार्यालयात आला किंवा कोणी ओळखीचा स्नेही घरी आला तर, 'काय चार्जशीट मिळाल वाटतं?' की 'मागणीपत्र पाठवायच आहे ?' 'मुलाला विशिष्ट शाळेत किंवा महाविद्यालयात प्रवेश हवा असेल ?' 'काय नोकरीसाठी शब्द टाकायचा आहे काय ?' की 'उसने पैसे हवे आहेत?' हे किंवा असे प्रश्न विचारुन अभ्यागताला नाउमेद केले जाते. कारण अंत:करणात प्रेम नाही, रामदास म्हणतात,

**आडले, जाखले जाणावे । यथानुशक्ती कामास यावे ।**
**मृदुवचन बोलत जावे । कोणी येकासी ॥**

आपण काम तर करतोच. उसने पैसे देतो किंवा त्याच्यासाठी शब्द टाकतो. पण आलेल्या व्यक्तीला लागेल असे, खुपेल असे बोलतो. 'बोल कोणालाही खुपेल का?' याची काळजी मा. दत्तोपंत घेत. ज्ञानेश्वर पुढे म्हणतात -

**बोलता अधिकुही निघे । तरी कोण्हासी वर्मीं न लगे ।**
**कोण्हासी न रिघे । शंका मनी ॥**
**मांडिली गोठी हन मोडैल । वासिपैल कोण्ही उडैल ।**
**आईकोनिची वोवांडिल । कोण्ही जरी ॥**
**तरी दुवाळी कोणा न व्हावी । कवणाची भंवई नुचलावी ।**
**ऐसा भावो जीवी । म्हणोनी उगा ॥**

आलेला कार्यकर्ता रटाळपणे आपली कहाणी सांगतो आहे. दत्तोपंतांच्या पुढे असंख्य कामांचा ढीग आहे, पण ते कार्यकर्त्याला कधीच थांबवीत नसत. 'मांडिली गोठी हन मोडैल' तो जी कथा सांगतो आहे तिचा रसभंग होता कामा नये. कित्येकदा दत्तोपंतांना ती केस पूर्ण माहित असे, पण ते कधीही मला हे माहित आहे किंवा थोडक्यात सांग असे कुणालाही, चुकूनही म्हणालेले नाहीत. आम्ही आसपास असणारे कायकर्ते - महत्त्वाची कामे घेऊन आलेले - अनाहुत अभ्यागत जो चऱ्हाट लावून बसलेला असेल त्यावर

वैतागत असू. पण दत्तोपंत रस घेऊन त्याची कंटाळवाणी कथा ऐकत असत. त्याला थोडी देखील मानसिक दुखापत होणार नाही, एखादा ओरखडा उठणार नाही, 'तरी दुवाळी कोणा न व्हावी । कवणाची भंवई नचुलावी ।' समोरच्याची किंवा शेजाऱ्याची भुवई सुद्धा आश्चर्य किंवा अन्य भाव दाखविणारी हालणार नाही, उलचणार नाही अशी त्यांची वागणूक असे. सर्व कथा सांगून झाली की मग आलेला अभ्यागत दत्तोपंतांना सल्ला विचारी. त्यावेळी सल्ला ऐकणाऱ्याला दत्तोपंत भासत -

**मग प्रार्थिला विपायें । जरी लोभे बोले जाये ।**

**तरि परिसे तया होये । मायबापु ॥**

सल्ला मागितला, विनंती केली की दत्तोपंत जी उत्तरे देत त्यामुळे आपले आईवडीलच बोलताहेत असे ऐकणाऱ्याला वाटे 'तरी परिसे तया होये । मायबापू॥' त्याला अस वाटायच की-

**कां नांदब्रह्मची मुसे आले । की गंगापय असलेले ।**

**पतिव्रते आले । वार्धक्य का ?**

दत्तोपंतांच्या आवाजातली ऋजूता, आवाजातली मृदुता ऐकून, ऐकणाऱ्यास वाटावे जणू नादब्रह्मच साकारले आहे, प्रत्यक्ष रुप घेऊन पुढे ठाकलेले आहे किंवा गंगानदीच्या पात्राकडे पाहिल्यावर, त्या पाण्याचा आवाज ऐकल्यावर जो भाव निर्माण होतो त्याची प्रचिती यावी. 'पतिव्रते आले । वार्धक्य का ?' ज्ञानदेवांच्या या शब्दांचा भावार्थ आजच्या स्त्री मुक्तीच्या काळात कुणाला समजूच शकणार नाही. ज्ञानदेवांच्या काळात पत्नी - नवऱ्याला आज्ञा देत नसे - पण ती जरा वृद्ध झाली की नवऱ्याला काही सांगत असे. याचे उत्तम उदाहरण सापडते. 'स्वामी' कादंबरीत. रमाबाई - माधवरावांशी बोलताहेत - रात्र झालेली आहे, उशीरापर्यंत माधवराव लिहित बसलेले आहेत, कामात व्यग्र आहेत आणि रमाबाईंची इच्छा आहे की माधवरावांनी जागरण करू नये. त्यांच्या प्रकृतीला ते झेपत नाहीये. त्या म्हणतात, 'वैद्यांचं असं म्हणण आहे, की इकडच्यांनी जास्त जागू नये.' रमाबाईंचं हे जे बोलणे आहे, त्या मागची आत्मीयता, प्रेम, एकत्वाचा भाव, त्यातून निर्माण होणारे आत्मिक समाधान आजच्या स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या काळात 'आता पेपर वाचन पुरे, दिवा बंद कर आणि झोप' असं पतीवर खेकसणाऱ्या पत्नीला कसे लाभणार? 'पतीव्रतेचे बोलणे, नादब्रह्माचे सावयव साकारलेले रुप असते कसे ?

**तैसे साच आणि मवाळ । मितले परि सरळ**
**बोले जैसे कल्लोळ । अमृताचे ।**

साचे म्हणजे खरे, पूर्ण सत्य, परंतु सत्य असूनही अत्यंत मवाळ, अत्यंत मृदू. कित्येकदा सत्य कठोर असते, अप्रिय असते. सत्य तर बोलायचे परंतु अत्यंत मृदू, 'साच आणि मवाळ । मितले परी सरळ ।' मितले म्हणजे थोडक्यात, अगदी थोडक्यात, लांबण न लावता परंतु ते अगदी सरळ, अर्थ स्पष्ट होणारे. माझ्या मनात विनोबा भावेंबद्दल खूप आदर आहे. पण त्यांची एक कथा सांगतात, त्यांना काही कार्यकर्ते भेटायला गेले, स्थानापन्न झाले, परंतु आलेले कार्यकर्ते बोलणे सुरू करणार तत्पूर्वीच श्री. विनोबा म्हणाले, 'चालते व्हा'. आलेले कार्यकर्ते अत्यंत अभिमानी होते. कार्यकर्तेच ते, ते निरभिमानी कसे असतील ? ते तडक उठले आणि आश्रमाच्या बाहेर पडले. मागोमाग एक कार्यकर्ता धावत आला आणि म्हणाला, 'अहो रागावलात काय ?' विनोबा तुम्हाला म्हणाले, 'चालते व्हा'. हा महान संदेश आहे. 'चालते व्हा' म्हणजे चालत राहा, चालत राहा, चरैवेती, चरैवेती । हा महान संदेश. पण हा समजायला कठिण. थोडक्यात सल्ला द्यायला हवा, पण तो सरळ, साधा, सोपा, समजण्याजोगा हवा. म्हणून बोलणे 'मितले परि सरळ' असे असून 'बोले जैसे कल्लोळ । अमृताचे' जणू अमृताचे कल्लोळ अंगावर यावेत. कितीही निराश होऊन आलेला कार्यकर्ता असो, वैतागलेला असो पण त्याच्यावर अमृतसिंचनच व्हायचे. एकदा दत्तोपंतांकडे एक ज्येष्ठ कार्यकर्ता आला. मी शेजारीच बसलो होतो. त्याची आणि माझीही जवळची ओळख, घनिष्ठ संबंध होते. संघटनेत चाललेल्या काही गोष्टी सांगून तो म्हणाला, 'मी कामातून थांबावे म्हणतो.' दत्तोपंतांनी काय उत्तर द्यावे? दत्तोपंत म्हणाले जर संघटनेची अशी स्थिती असेल तर तुम्ही आणि मी आपण दोघेही थांबूया. मी तरी कशाला काम करायला हवे ? आपण दोघांनी कामातून थांबावे हे उत्तम. दत्तोपंत कामातून थांबणार ही कल्पनाच कार्यकर्ता करू शकणार नाही. त्याला आपली चूक कळली. अनेक आघात सहन करून देखील - 'दृढ निश्चयाचेनी बळे । दृष्य असताच ना ढळे । सदा स्वरुपी मिसळे । या नाव साधक'. दृष्य जग कितीही भीषण असलं तरी साधक स्वत:च्या निश्चयापासून थोडासाही ढळत नाही.

'निश्चयाचा महामेरू' म्हणून उभे राहायचे तर ज्याची अंतरात्म्याशी एकतानता झालेली आहे, जो 'स्व' रुपात पूर्ण मिसळला आहे, तोच साधक - दत्तोपंतांचा सल्ला अशा

निराश कार्यकर्त्यांवर अमृत सिंचन करणारा होता. 'साच आणि मवाळ । मितले परी सरळ। बोले जैसे कल्लोळ । अमृताचे ॥' या ज्ञानदेवांच्या ओवीचा वारंवार प्रत्यय माझ्यासारख्यास येत असे. मा. दत्तोपंत हे आध्यात्मिक बैठक असलेले एक योगी पुरुष. असा योगी जसे योग्य बोलतो तसे अयोग्य टाळतो, अशा अयोग्य शब्दरचनेचा त्यांनी संपूर्ण त्याग केलेला असतो. ज्ञानेश्वरांच्याच भाषेत सांगायचे तर - 'विरोधु वायुबळु । प्राणु ताप ढाळु। उपहासु चाळु । वर्मस्पर्शू ॥ आटु, वेगु, विंदाणू। आशा, शंका प्रतारणू। हे संन्यासी अवगुणु । जिया वाचा ॥ विरोधी वाद वाढविणारे, दुसऱ्यांना तापदायक, उपहास करणाऱ्या किंवा वर्माला स्पर्श करणाऱ्या, अर्धवट किंवा अधिक किंवा खोटी आशा लावणाऱ्या, शंकास्पद किंवा प्रतारणा करणाऱ्या अशा अवगुणयुक्त भाषेचा त्यांनी पूर्ण संन्यास घेतलेला असतो. अशा वाक्यांचा आणि शब्दांचा ते कधीच उल्लेख करणार नाहीत. पण त्यांचे काही शब्द गाजलेले होते. जेव्हा कामगार क्षेत्रावर कुऱ्हाडच चालविण्याचे अर्थमंत्र्यांनी ठरविले, तेव्हा त्यांनी अर्थमंत्र्यांबद्दल 'क्रिमिनल' हा शब्द वापरलेला होता. त्यांचे हे भाषण देखील अहिंसकच होते. केंद्र सरकार जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या दबावाला बळी पडत होते. सरकार कामगार कायद्यात 'हायर अँड फायर' ही नीती आणू इच्छित होते. हे थांबविणे आवश्यक होते, बाह्य दबावाला बळी पडून आपले कायदे न बदलता आपल्या देशाच्या दृष्टीने, आपल्या उद्योगांच्या दृष्टीने, जे आवश्यक ते बदल करायलाच हवेत असे दत्तोपंतांचे म्हणणे असे - हे त्यांचे मत सर्व समाजासमोर आले नाही. 'क्रिमिनल' हा शब्द आला. मी त्यांना नंतर विचारले, हा शब्द कसा उच्चारला ? ते म्हणाले, भाषणात या शब्दाचा वापर करण्यापूर्वी काही दिवस आधी मी एक तास या शब्दाबद्दल विचार केला होता. माझे समाधान झाले. कारण मला 'अहिंसा' या शब्दाची ज्ञानदेवांची केलेली व्याख्या आठवली. ते म्हणतात, 'जगाचिया सुखोद्देशे' - जगाच्या सुखासाठी, 'काया, वाचा, मानसे' - शरीराने, वाचेने किंवा मनाने जे वागणे, जे वर्तन ते म्हणजे अहिंसा. 'जगाचीया सुखोद्देशे । काया वाचा मानसे । वर्तणे अहिंसे । रुप जाण ॥' अहिंसेचे रुप जी कृती जगाच्या सुखोद्देशाने केलेली असेल ती कृती - त्या कृतीचे जे रुप, ते म्हणजे अहिंसा. रथाचे चाक जमिनीत घुसलेले आहे, कर्ण ते बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यावेळी अर्जुनाने त्याच्यावर बाणांचा वर्षाव करणे ही अहिंसा.

अहिंसा ही मनात असायला हवी. द्वेष, मत्सर, क्रोध, मनात असेल तर आपल्या वागण्या बोलण्यात, बाह्य कितीही सराव केला तरी त्या गोष्टी परिणामकारक ठरणार नाहीत. आपल्या संत महंतांचे हे म्हणणे होते - डेल कार्नेजीला हे शिकविणे शक्य नाही. आपल्या बाह्य हालचालीतून अंतरंगच ओसंडत असते. आजच्या 'स्पर्धा' हा प्रगतीचा मंत्र असलेल्या काळात 'अहिंसा' ही मनात कशी रुजेल आणि आमचा व्यवहार आणि वागणे, बोलणे हे तरी सुयोग्य कसे होईल ? अहिंसा मनात हवी तरच ती चालण्या-बोलण्यात व्यक्त होईल. कारण मन, अंत:करण, शरीर, अवयव हे सर्व एकच असते. ज्ञानेश्वरांनी याचे फार चांगले वर्णन केलेले आहे.

**काई शाखा नव्हे तरु । जळेवीण असे सागरु ।**
**तेज आणि तेजाकारु । आन काई ॥९३॥**
**अवयव आणि शरीर । हे वेगळाले काई कीर ।**
**की रसू आणि नीर । सिनी आधी ॥९४॥**
**म्हणोनि हे जे सर्व । सांगितले बाह्यभाव ।**
**ते मनचि गां सावयव । ऐसे जाणे ॥९५॥**
**जे बीज भुईं खोविलें । तेचि वरी रुख जाहले ।**
**तैसें इंद्रियाद्वारे फांकले । अंतरचि ॥९६॥**
**पै मानसींचि जरी । अहिंसेचि अवसरी ।**
**तरी कैंची बाहेरी । वोसंडेल ॥९७॥**
**आवडे ते वृत्ती किरीटी । आधी मनौनी उठी ।**
**मग ते वाचे दिठी । करांसी ये ॥९८॥**

फांद्या म्हणजेच झाड, सागर म्हणजेच पाणी, तेज म्हणजेच सूर्य, अवयव म्हणजेच शरीर, पाणी म्हणजेच पातळपणा हे मान्य केले की आपले जे बाह्यभाव आहेत ते सावयव होऊन बाहेर आलेले आपले मनच आहे. जे बी आपण जमिनीत पुरू, तेच झाड होऊन वर येईल. कारळ पेरुन गहू येणार नाही. त्यामुळे पहिल्यांदा मनात भाव निर्माण होतो आणि आपले बोलणे, दृष्टी, हातवारे या सर्वांद्वारे ते बाहेर पडते. मा. दत्तोपंत हे खऱ्या अर्थाने योगी होते. अशा योग्याला प्रयत्नपूर्वक काही करावेच लागत नाही. त्यांच्या सर्व बाह्यकृती अगदी स्वाभाविक होत असतात. अन्य माणसे आणि ही थोर व्यक्ती यांच्यात

अन्यथा काही निराळेपण जाणवणार नाही.

**तो इंद्रिया आज्ञा न करी । विषयांचे भय न धरी**

**प्राप्त कर्म न अव्हेरी । उचित जे जे । ३-६९ ।।**

जे जे उचित असेल, योग्य असेल ते सर्व करायचे. आवश्यक ते बाह्य जगातील सर्व व्यवहार करीत असताना त्यापासून निराळे राहायचे. पाण्यात राहून पद्मपत्र कमळाच्या पानाप्रमाणे निर्लेप राहायचे असे ते कर्मयोगी होते.

अशा कर्मयोगी माणसांचे वागणे, बोलणे कसे असते त्याचे मनोहारी वर्णन ज्ञानेश्वर महाराज करतात. ते म्हणतात -

**जो अंतरी दृढु । परमात्मरुपी गुढु । बाह्यतरी रुढु । लौकुकू जैसा । ३-६८ ।।**

**तो कर्मेंद्रियें कर्मी । राहटता तरी न नियमी । परि तेथिचेनी उर्मी ।**

**झाकोळेना ।३-७० ।।**

**तो कामनामात्रे न घेपे । मोहमळे न लिंपे । जैसे जळी न शिंपे ।**

**पद्मपत्र ।३-७१ ।।**

**तैसा संसर्गामाजी असे । सकळांसारिखा दिसे । जैसे तोयसंगे आभासे ।**

**भानुबिंबे ।३-७२ ।।**

**तैसे सामान्यत्वे पाहिजे । तरी साधारणुचि देखिजे । येरवी निर्धारिता नेणिजे ।**

**सोय जयाची । ३-७३ ।।**

**ऐसा चिन्ही चिन्हितू । देखसी तोचि मुक्तु । आशापाशरहितु ।**

**वोळख पां ।३-७४ ।।**

**अर्जुना तोचि योगी । विशेषिजे जो जगी । म्हणोनि ऐसा होय यालागी ।**

**म्हणिये तूते ।३-७५ ।।**

वरीलपैकी 'तैसा सामान्यत्वे पाहिजे । तरी साधारणुचि देखिजे । येरवी निर्धारिता नेणिजे । सोय जयाची ।। ३-७३ ।।' या ओवीचे अधिक विवरण करायला हवे. माझ्यावर मा. दत्तोपंत एकदाच अतिशय संतापले. कारण घडले होते ते जळगाव अधिवेशनातील त्यांची केलेली सोय. जळगावला प्रदेशाचे अधिवेशन होते. सर्व प्रतिनिधींच्या निवासासाठी निरनिराळ्या शाळा घेतलेल्या होत्या. शाळेच्या खोल्या संडास नसलेल्या, काही सार्वजनिक संडास होते. म्हणून दत्तोपंतांची व्यवस्था एका मोठ्या घरी केलेली होती. मी स्टेशनवर

आणायला गेलो नव्हतो. मी व्यवस्थेत होतो. त्यांना स्टेशनवरून परस्पर जेथे सोय केलेली होती तेथे नेले. चहापान इ. झाले. मला तातडीने बोलवले आहे असे सांगितले. मी गेलो. मला त्यांनी एकट्याला खोलीत बोलावले. ते खूपच संपातलेले होते. पहिला प्रश्न, माझी उतरण्याची व्यवस्था येथे का केली ? मी म्हटले सर्व स्थानिक कार्यकर्त्यांनी ठरवले. संघाच्या पदाधिकाऱ्यांनाही त्यांनी विचारलेले होते. तुम्हाला कळत नाही काय ? माझे बेडिंग येथून ताबडतोब अधिवेशनस्थानी न्या. मी म्हटले तेथे सोई नाहीत. इतरांच्या काय आहेत ? मी काही सांगितले. आताच्या आता माझे बेडिंग व सर्व सामान अधिवेशनस्थळी न्या व आपण तिकडेच जाऊ. त्यांना इतके संतापलेले मी कधीच पाहिले नव्हते. ते शाळेत राहायला आले. सर्वांसाठी असणाऱ्या प्रसाधनगृहाचाच वापर तीन दिवस त्यांच्यासाठी होता.

**तैसा सामान्यत्वू पाहिजे । तरी साधारणुची देखिजे ।।**

या ओळींची मला आठवण झाली. स्वतंत्र निर्धारित सोय नको, सर्वांसारखे राहायचे. याला म्हणतात योगी.

मा. दत्तोपंत योगी होतेच. पण उत्तम पुरुष होते. रामदासांनी जी 'उत्तम पुरुषाची लक्षणे' सांगितली आहेत, ती म्हणजे दोन निरनिराळे गुण जे बहुधा एकत्र दिसत नाहीत, त्यांच्या जोड्या श्री रामदासांनी लावलेल्या आहेत. त्यातील एखादी किंवा एक दोन भिन्न जोड्या एकत्र आल्या तरी तो उत्तम पुरुष. पण श्री दत्तोपंतांच्या ठिकाणी या सर्व गुणसमुच्चयाचे दर्शन कार्यकर्त्यांना होत असे. म्हणून मी तर म्हणेन दत्तोपंत हे उत्तम पुरुष नव्हते तर सर्वोत्तम पुरुष होते. काय आहेत त्या भिन्न गुणांचा जोड्या -

**परम सुंदर आणि चतुर । परम सबळ आणि धीर ।**
**परम संपन्न आणि उदार । अतिशयेसी ।**

जो किंवा जी अतिशय सुंदर असते ती चतुर, हुशार, बुद्धीमान असतेच असे नाही. म्हणून अलीकडे सौंदर्यस्पर्धेत बुद्‌ध्यांकही पाहिला जातो. जो शक्तीमान असतो त्याच्यात धीरोदात्तता असतेच असे नाही. त्याचे बाहुसारखे फुरफुरत असतात आणि जो खूप धनिक असतो तो कित्येकदा कृपण असतो.

दत्तोपंतांचे व्यक्तीमत्त्व भारदस्त आणि आकर्षक तर होतेच. परंतु त्यांच्या चतुराईबद्दल काय बोलावे ? प्रचंड मोर्चा झालेला आहे. शक्ती प्रदर्शन झाले आहे. अशावेळी धीर

धरणारे नेते किती, प्रसिद्धीपासून दूर राहणारे किती ? दिल्ली मोर्चा झाला. मा. दत्तोपंतांवर सर्व कॅमेरे एकत्र झाले. मुलाखत मागू लागले. दत्तोपंतांनी टाळले. त्यांनी कधी, एकदाही प्रसारमाध्यमांना मुलाखत दिलेली नाही. त्यांच्यामागे शक्ती होती, परंतु त्यांची धीर धरण्याची हिंमत देखील तितकीच. त्यांना खासदार असल्याने मानधन मिळत होते, पण मिळणाऱ्या पैशांवर अल्पदेखील अधिकार त्यांनी ठेवला नाही. सर्व रक्कम संघटनेत जमा. अशा भिन्न गुणांची त्यांच्यात गुंफण होती. एकच नाही अनेक. रामदास पुढे म्हणतात,

**परम ज्ञाता आणि भक्त । महापंडित आणि विरक्त**
**महा तपस्वी आणि शांत । अतिशयेसी ॥**
**वक्ता आणि नैराश्यता । सर्वज्ञ आणि सादरता ।**
**श्रेष्ठ आणि नम्रता । सर्वत्रासी ॥**

अनेक विद्वान माणसं किती लुब्ध असतात आणि अनेक तपस्वी हे दुर्वास ऋषीच असतात. सर्वज्ञ असूनही अन्य सर्वांचे बाबत आदर ठेवणारे आणि अतिश्रेष्ठ असूनही विनम्र असे दत्तोपंत. श्री. रामदासांनी पुढे म्हटलेले आहे.

**राजा आणि धार्मिक । शूर आणि विवेक**
**तारुण्य आणि नेमक । अतिशयेसी ॥**
**कार्यकर्ता निरभिमानी । गायक आणि वैष्णवजनी ।**
**वैभव आणि भगवद्‍भजनी । अत्यादरे ॥**
**आदर सन्मान तार्तम्य जाणे । प्रयोग समयो प्रसंग जाणे ।**
**कार्यकारण चिन्हे जाणे । विचक्षण बोलिका ।**
**सत्यवचनी शुभवचनी । कोमल वचनी, येक वचनी ।**
**निश्चय वचनी सौख्य वचनी । सर्वकाळ ॥**
**सुगड संगीत गुणग्राही । अनापेक्षी लोकसंग्रही ।**
**आर्जव सख्य सर्वही । प्राणीमात्रासी ॥**
**मित्रपणे परहित कारी । वाग्माधुर्ये पर शोकहारि ।**
**सामर्थ्य पणे वेत्रधारी । पुरुषार्थे जगन्मित्र ॥**
**संशयच्छेदक विशाळ वक्ता । सकळ क्लृप्त असोनि श्रोता ।**
**कथा निरुपणी शब्दार्था । जाऊच नेदी ॥**

दत्तोपंतांचे भाषण ऐकले की मनात कोणताही संशय राहणारच नाही. सर्व विषयांचे गाढे अभ्यासक असे दत्तोपंत, पण इतरांची भाषणे किती तन्मयतेने ऐकत हे आपण सर्वांनी पाहिले आहे. एकदा नागपूरला केवळ वीस जणांचा तीन दिवसांचा चिंतनवर्ग होता. एकूण १८ सत्रे झाली. केवळ पहिल्या सत्रात मा. दत्तोपंत मधल्या खुर्चीत बसले होते. डॉ. बोकरे संयोजक - प्रत्येकाने एक निबंध थोडक्यात मांडायचा व नंतर चर्चा. सर्व तीन दिवस दत्तोपंत समोर श्रोत्यांमध्ये बसलेले, लक्षपूर्वक सर्व चर्चा ऐकणारे. प्रत्येक प्रतिनिधींनी एक निबंध वाचायचा अशी योजना होती. त्यांच्यासमोर विषय मांडणी करताना माझी ततपपच होत होती. एक सांगायला हरकत नाही, त्या चिंतन बैठकीत नंतर अर्थमंत्री झालेले श्री. यशवंत सिन्हा उपस्थित होते व त्यांनी निबंध सादर केलेला होता 'भारत विश्व व्यापार संघटनेतून बाहेर पडू शकतो'. संपूर्ण तीन दिवस 'सकळ क्लृप्त असोनी श्रोता' या ओळीची साक्ष दत्तोपंतांची ती श्रवणभक्ती पाहून दृढ होत होती.

'कथा निरुपणी शब्दार्था । जाऊच नेदी' या ओळीवर देखील बोलायला हवे. तसे सर्वच ओव्यांचा दत्तोपंतांच्या संदर्भात स्पष्टीकरणासह भावार्थ सांगायला हवा, पण वेळ पुरणार नाही. म्हणून केवळ या एका ओळीचे अधिक स्पष्टीकरण. आपणापैकी अनेकांनी त्यांची भाषणे ऐकली आहेत. अमेरिकेच्या आर्थिक साम्राज्यवादाचे विरोधात ते बोलत. पण ते जेव्हा जेव्हा अमेरिकेचा उल्लेख करीत तेव्हा तेव्हा आवर्जुन सांगत, 'मी जेव्हा अमेरिका म्हणतो तेव्हा तेथील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मालक व राज्यकर्ते मला अभिप्रेत आहेत. अमेरिकेतील सामान्य जनतेचा त्यात समावेश नाही.'

आपण त्यांच्या भाषणाच्या टेप्स आजदेखील ऐकू शकतो. त्यात साम्राज्यवादी अमेरिका असा उल्लेख झाल्याबरोबर ते वरील पुस्ती जोडीतच जोडीत.

**कथा निरुपणी शब्दार्था । जाऊच नेदी ।।**

त्यांच्या भाषणात शब्दांबद्दलचा आग्रह फार असे. उदाहणार्थ समता या शब्दाऐवजी समरसता - सर्वपंथ समादर मंच अशा सभांमधून या शब्दार्थांबाबत त्यांची काळजी लक्षात येई. रामदास पुढे म्हणतात -

**वेवादरहित संवादी । संग रहित निरोपाधी ।**
**दुराशा रहित अक्रोधी । निर्दोष निर्मत्सरी ।।**
**विमळज्ञानी निश्चयात्मक । समाधानी आणि भजक ।**
**सिद्ध असोनि साधक । साधन रक्षी ।।**

मा. दत्तोपंत सिद्ध पुरुष होतेच होते परंतु ते साधक होते इतरांसाठी आणि साधनाचे रक्षण ते अत्यंत बारकाईने करीत. कार्यक्रमाचे उद्‌घाटनाचे वेळी दीपप्रज्वलन करणे. पण काडेपेटी पेटवणे किंवा मेणबत्तीने समईतील वात पेटवणे यावेळी स्टेजवरचे पंखे चालू असता कामा नयेत अशा बारीक-सारीक गोष्टी अत्यंत बारकाईने ते कार्यकर्त्यांना सांगत. त्यांची कार्यकर्त्यांसाठी लिहिलेली पुस्तके - 'वक्तृत्वाची पूर्वतयारी', 'युवर ऑफीस', 'युवर इक्विपमेंट', 'प्रचारतंत्र' वगैरे मधून त्यांनी किती लहान लहान गोष्टींची काळजी घ्यायला हवी ते कार्यकर्त्यांना सांगितले आहे. असे साधनरक्षी दत्तोपंत. असे साधन रक्षण करण्याचे मुख्य कारण त्यांना गीतेतील शिकवण होती.

**यद्यदाचरति श्रेष्ठ: तत्त देवेतरो जनाः ।**
**सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥**

श्रेष्ठ माणूस जसा वागतो तसेच इतर सामान्य लोक वागतात. तो जे करतो, त्याचे लोक अनुकरण करतात. या सर्व गुणांचा एकत्रित समुच्चय दत्तोपंतांच्या व्यक्तीमत्त्वात असल्यानेच सर्वोत्तम पुरुषाचे दुर्लभ लक्षण -

**सुखरुप संतोषरुप । आनंदरुप, हास्यरुप ।**
**ऐक्यरुप, आत्मरुप । सर्वमासी ॥**

त्यांच्या ठिकाणी दृगोचर होत असे.

कैलासवासी दत्तोपंत हे मुळात अध्यात्मप्रवण मार्गी, योगी व सर्वोत्तम पुरुष असल्यामुळे अन्य समाज संघटक, राजकीय नेते, मुत्सद्दी इ. पेक्षाही अनेक बाबतीत वरचढ होते. ते 'व्हिजनरी' होते. 'द्रष्टे' होते. खूप दूरचे पाहणारे. १९८१ मध्ये त्यांनी कम्युनिझम संपणार आहे असे जाहिररीत्या सांगितले होते. मी मजदूर संघातले त्यांचे भाषण १९६७ मध्ये दादरला एका गच्चीवर ऐकले. तेव्हा ते म्हणाले होते, "आपल्या देशात कम्युनिझम येणार नाही. तुम्ही कम्युनिस्टांच्या विरोधात काम करण्याचा विचार करत असाल तर तो सोडून द्या. डोक्यावरुन पांघरुण घेऊन झोपा. आपल्या देशात कम्युनिझम रुजूच शकत नाही. मुंबईत तर तो लवकरच संपेल. काळजी नको." हे त्यांचे भाषण ऐकल्यावर मी चकितच झालो. कारण त्यावेळी मुंबईच्या गिरणी कामगारांचे श्रीपाद अमृत डांगे हे अनभिषिक्त राजे होते. साम्यवादाचे गाढे अभ्यासक, प्रकांड पंडित आणि कामगारांचे लाडके नेते - त्यावेळी दत्तोपंत आम्हास सांगत होते, कम्युनिस्टांचे विरोधात काम करण्याची

आवश्यकता नाही, पांघरुण घेऊन तुम्ही झोपलात तरी चालेल. त्यांनी स्वदेशी जागरण मंचाच्या व्यासपीठावरून हे अनेकदा सांगितले आहे की अमेरिकेची दादागिरी ही तिच्या सामर्थ्यामुळे आहे असे अजिबात नाही, ही दादागिरी तिच्या दुर्बलतेमुळे आहे, कमजोरीमुळे आहे. Weakness मुळे आहे आणि अमेरिका देखील भविष्यात कोलमडणार आहे. ते द्रष्टे पुरुष असल्यामुळेच १९८४ पासून त्यांनी आर्थिक साम्राज्यवादाचे विरोधात दंड थोपटले.

सामाजिक संघटनांच्या देखील वरचे असलेले दत्तोपंत हे खऱ्या अर्थाने विरक्त पुरुष आणि महंत संघटक होते.

**महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे ।**
**जाणते करुन विखरावे । नानादेही ।**

हा रामदासांचा आदेश त्यांनी व्यवहारात आणला. 'उदंड समुदाये करावे । परी गुप्तरुपे' ही रामदासांची शिकवण आजच्या प्रसिद्धीच्या युगात श्री. दत्तोपंत जगत होते. संघसृष्टी व विशिष्ट वैचारिक स्तरातील लोक सोडता दत्तोपंत हे सामान्य जनांमध्ये लोकांना माहितीसुद्धा नाहीत. त्यांचे नाव कधीच न ऐकलेले, वाचलेले कोट्यवधी लोक भारतात आहेत. कार्यकर्ते आणि त्यांनी स्थापन केलेल्या महान संघटना व संस्था यामध्ये मात्र ते चिरपरिचित. खऱ्या महंतांचे जे स्वरुप

**आहे तरी सर्वांठायी । पाहो जाता कोठेच नाही ।**
**जैसा अंतरात्मा ठायींचा ठाई । गुप्त जाला ।**
**त्यावेगळे काहीच जसे । पाहोजाता तो न दिसे ।**
**न दिसोन वर्तवीतसे । प्राणीमात्रासी**
**तैसाच हाही नानापरी । बहुत जनास शहाणा करी ।**
**नाना विद्या त्या दिवरी । स्थूळ सूक्ष्मा**
**जयास येत्नची आवडे । नानाप्रसंगी पकडे**
**धीटपणे प्रगटे । दडे ऐसा नव्हे**

जेव्हा विश्व व्यापार संघटनेपुढे सरकार झुकू लागले तेव्हा एखाद्या पहाडाप्रमाणे दत्तोपंत उभे राहिले. दडले नाहीत, प्रगट झाले. नव्हे दत्तोपंतांना अधिक प्रसिद्धी मिळाली ती तेव्हापासूनच.

परंतु पूर्ण जीवनभर त्यांनी जी असंख्य माणसे कामाला लावली, त्यासाठी प्रचंड

भ्रमण केले -

**लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।**
**जाणजाणोन धरावे । जवळदुरी ।**
**अधिकारपरत्वे कार्य होते । अधिकार नसता वेर्थ जाते ।**
**जाणोनि शोधावे चित्ते । नाना प्रकारे ।**

सतत भारत भ्रमण, विश्व भ्रमण, माणसे शोधायची, संघटना आणि संस्था उभ्या करायच्या, प्रचंड अध्ययन करायचे, व्यापक संपर्क ठेवायचा असे हे महान व्यक्तिमत्त्व. रामदासांच्या भाषेत -

**ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा**
**दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा।**

आतापर्यंत आपण त्यांच्या व्यक्तिदर्शनाचा अल्पसा मागोवा घेतला आता त्यांच्या ध्येयवादासंबंधी थोडासा विचार करु या.

माननीय दत्तोपंतांनी अनेक मास ऑर्गनायझेशन उभ्या केल्या, वाढविल्या हे आपल्याला माहित आहे. पण सर्वात मुख्य गोष्ट 'साम्यवादही नको, भांडवलशाही देखील नको, तिसरा मार्ग हवा.' Neither Capitalism, Nor Communism, Our's is the Third Way i.e. Integral Humanism. या विषयावर त्यांनी बरेच चिंतन केले व बरेचसे लेख देखील लिहिले, परंतु या विषयाचे सिद्धांतन करण्याची आवश्यकता होती. हे काम अत्यंत मोठे होते. संघटनात्मक कार्य, संघर्ष इ. सर्व गोष्टी सांभाळून ते पूर्ण होणारे नव्हते. या एकात्म मानव दर्शनावर आधारित राष्ट्रीय विकासनीती, राष्ट्रीय अर्थनीती, राष्ट्रीय शिक्षणनीती इ. नीती शब्दबद्ध करण्याची नितांत व तातडीची आवश्यकता त्यांना भासत होती. त्यांच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे कार्य होत नव्हते. त्यांच्या लेखांचा संग्रह 'Third Way' म्हणून प्रकाशित झाला. परंतु या गहन विषयाचे सामुहिक संस्थागत चिंतन, अध्ययन अपुरेच आहे अशी खंत ते वैयक्तिक बोलण्यातून व्यक्त करीत. त्यांनी स्थापन केलेल्या सामाजिक समरसता मंचाचे काम महाराष्ट्रापुरते मर्यादित आहे. सर्वपंथ समादर मंचाने आवश्यक जोर पकडलेला नाही. पर्यावरण मंचाची अजून केवळ पाटीच आहे हे त्यांना जाणवे. परंतु संघटनेची एकूण शक्ती व कार्यकर्त्यांची समज लक्षात घेता त्यांना ही कार्ये पुरी करता आलेली नाहीत. त्याचवेळी दुर्दैवाने सर्वश्री बडेभाई, मनहर

मेहता, बाळासाहेब साठ्ये अशी दिग्गज सहकारी कार्यकर्ती मंडळी अल्पायुषी ठरली. निर्माण केलेली एक समर्थ फळी काळाआड गेली, पण ते थांबले नाहीत.

१९८४ साली त्यांनी हे स्पष्ट केले की परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांचे मालक, देशातील काही मोठे भांडवलदार व केंद्र सरकार यांची युती गरीब जनताहितविरोधी धोरणे स्वीकारीत आहे. त्याविरुद्ध कामगार, शेतकरी, विद्यार्थी, ग्राहक यांची अभेद्य एकजूट उभी करायला हवी आणि खूप मोठा संघर्ष करायला हवा. १९८६ साली 'गॅट' अंतर्गत उरुग्वे राऊंड सुरू झाली. ९० चे सुमारास डंकेल प्रस्ताव पुढे आला आणि दत्तोपंतांनी परमपूजनीय डॉक्टरांनी १९२० मध्ये भारताचे ध्येय काय असावे यासंबंधीचा जो ठराव काँग्रेस अधिवेशनात मांडलेला होता, त्याचे स्मरण सर्व कार्यकर्त्यांना दिले. डॉक्टरांचा ठराव होता '**भारतात प्रजासत्ताक स्थापन करून जगातील गरीब राष्ट्रांची भांडवलशाही राष्ट्रांच्या जाचातून मुक्तता करणे हे आपले ध्येय हवे.**' डंकेल प्रस्तावाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी [redacted] जागरण मंचाची स्थापना केली आणि घोषणा केली - **स्वदेशी**

We have to wage a Second War for Economic Independance.

आपल्याला आर्थिक स्वातंत्र्यासाठी दुसरी लढाई लढावी लागेल. १९४७ साली आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झालो. पण स्वातंत्र्याची ही दुसरी लढाई आर्थिक स्वतंत्रतेची आहे. पुढे त्यांनी अधिक स्पष्टीकरण केले, 'आपली ही जी दुसरी लढाई आहे ही तिसऱ्या जागतिक महायुद्धाची लढाई आहे. १९१४ ते १९१८ हे पहिले जागतिक महायुद्ध, १९३९ ते १९४५ हे दुसरे जागतिक महायुद्ध आणि आता आपण जी लढाई सुरू करीत आहोत ती या तिसऱ्या महायुद्धाचा एक भाग आहे.' ते म्हणाले, 'This second war for economic independance is the part of Third World War.'

पुढे ते म्हणाले, 'या युद्धात नेहमीची लष्करी शस्त्रास्त्रे वापरली जाणार नाहीत तर आर्थिक शस्त्रास्त्रेच वापरली जाणार आहेत.'

In this war, instead of military weapons,
economic weapons are being used.

ही आर्थिक शस्त्रास्त्रे म्हणजेच जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व १९९५ मध्ये अस्तित्वात आलेली विश्‍व व्यापार संघटना - ही शस्त्रास्त्रे बहुराष्ट्रीय कंपन्या व राज्यकर्ते वापरीत आहेत. ही शस्त्रास्त्रेच निष्प्रभ करायला हवीत म्हणून

'डब्ल्यू. टी.ओ. मोडो, तोडो या छोडो' असा त्यांनी नारा दिला.

ते कार्यकर्त्यांना म्हणाले 'या लढ्यात आपण अग्रसीत व्हायचे आहे.'

We are the vanguard in this war.

आणि शेवटी ते म्हणाले, 'आपण या लढाईत विजयी होणारच होणार.' या विश्वासाने स्वदेशी जागरण मंचाद्वारे त्यांनी व्यापक जनजागरण सुरु केले. परंतु एन्रॉन प्रकरणात केंद्र सरकारने जी चुकीची पावले टाकली ती पाहता. दत्तोपंत व्यथित झाले. त्यांनी प्रत्येक अभ्यास वर्गात भाषण करताना कार्यकर्त्यांना सांगितले, 'डायरी काढा व मी एक चर्चिलचे वाक्य सांगतो ते लिहून घ्या.' ते म्हणाले, 'It is better to be irresponsible and correct than responsible and incorrect.'

त्यांना एकूण परिस्थिती दिसत होती. आक्रमणाची व्यापकता व गहराई त्यांना जाणवत होती. त्याचवेळी आपल्या कार्याच्या मर्यादा त्यांना व्यथित करीत होत्या. त्यामुळे सर्व संघटनांना एकाच वेळी एकच एक कार्यक्रम देणे अवघड होणार आहे हे त्यांनी ओळखले आणि म्हणून सातारा येथे १०, ११ व १२ फेब्रुवारी २००२ मध्ये समग्र अध्ययन केंद्राच्या वतीने जी प्रांतस्तरीय कार्यशाळा झाली त्यामध्ये जो एक विचार पुढे आला तो 'Think globally, act locally, respond personally' या विचारास त्यांनी मान्यता दिली.

आर्थिक स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढाईचे त्यांचे स्वप्न पुरे करण्याची, या लढाईचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारणे आणि स्वत:ला या कामात झोकून देण्याचा निर्धार करणे हेच श्रद्धासुमन आपण आज त्यांना वाहू या.

# एका अनोख्या नात्याचा वेध

## (प. पू. श्री गुरुजींचा कै. दत्तोपंताच्या आयुष्यावर असलेला प्रभाव जाणवेल असे काही प्रसंग, पंतांच्या लेखणीतून)

केंद्र सरकारच्या सोशॅलिस्ट कम्युनिस्ट युनियनच्या कॉन्फिडेरेशनने जुलै १९६० मध्ये देशव्यापी सार्वत्रिक संप केला. तो अयशस्वी झाला. त्यानंतर त्यावेळचे गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनी घोषणा केली की, 'आम्ही केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचा संपाचा अधिकार हिरावून घेऊ व त्याऐवजी Joint Consultation Machinery (JCM) निर्माण करु.' ही JCM ग्रेट ब्रिटनच्या 'व्हिटले कौन्सिल'च्या नमुन्याबरहुकूम राहील असेही त्यांनी घोषित केले. परंतु जी योजना प्रकाशित झाली तीवरून हे स्पष्ट झाले की भारत सरकारची JCM ही केवळ नाटक आहे. व्हिटले कौन्सिलमध्ये ज्याप्रमाणे आर्ब्रिट्रेशन अॅवॉर्ड सरकार व कर्मचारी दोघांवरही 'फायनल अँड बाईंडिंग' ठरविण्यात आले आहे, तशी व्यवस्था आपल्या सरकारच्या योजनेत नाही व आर्ब्रिट्रेशन अॅवॉर्ड आल्यानंतर इंग्लंडप्रमाणे त्याला 'फायनल अँड बाईंडींग' न मानता तो केवळ विचारार्थ सरकार ठेवून घेईल व त्यात आपल्या सोईप्रमाणे फेरफार करून मग त्यावर अंमलबजावणी होईल. इंग्लंडच्या व्हिटले कौन्सिलची इसेन्स या योजनेत गायब होते. त्यावर वर्तमान पत्रात चर्चाही आलेली होती. परंतु गृहमंत्रीसुद्धा वारंवार हे वक्तव्य देतच होते की काही झाले तरी केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचा संपाचा हक्क आम्ही हिरावून घेणारच.

मी दौऱ्यावरून परत आल्यावर संयोगाने सकाळच्या चहाचे वेळी कार्यालयातील स्वयंपाकगृहात प. पू. श्री. गुरुजींच्या समोरच बसण्याचा योग आला. गुरुजींनी विचारले की, 'नंदांच्या Statement बद्दल तुम्ही भारतीय मजदूर संघातर्फे काय प्रतिक्रिया प्रकाशित करणार ?' मी म्हटले, 'प्रकाशित काय करायची, आमची एकही युनियन आज सरकारी कर्मचारी क्षेत्रांत नाही शिवाय बी.एम.एस.चे एकूण काम आज इतके लहान आहे की आम्ही भलेही आपले वक्तव्य वृत्तपत्राकडे पाठवू परंतु कोणतेही वृत्तपत्र ते छापणार नाही.

कारण आम्हाला लोकल Status नाही.'

श्री गुरुजी म्हणाले की, 'आपल्यासमोर तो प्रश्न नाही. बी.एम.एस.ची युनियन त्या क्षेत्रात नसेल, परंतु आपले हजारो स्वयंसेवक सरकारी कर्मचारी आहेत. असे प्रसंग निर्माण होतात त्यावेळी विचार कसा करावा हे त्यांना सांगण्याची ही एक संधी आहे. प्रसंगाप्रसंगानेच अशा स्वयंसेवकांचे शिक्षण होत असते. त्यामुळे तुम्ही आपली भूमिका सर्व वृत्तपत्रांना द्या, ते भलेही प्रकाशित न करोत. परंतु जी आपली साप्ताहिके आहेत त्यामध्ये मात्र तुमचे वक्तव्य अवश्य प्रकाशित होईल असे पाहा. ऑर्गनायझर, पाञ्चजन्य, विवेक आदि. या तर नियतकालिकात छापणे घडवून आणता येईल. यात तुमची भूमिका प्रकाशित झाली की स्वयंसेवकांना याविषयावर मार्गदर्शन मिळेल.'

मी या प्रश्नावर विचारच केला नव्हता म्हणून सहजगत्या म्हटले की, 'हे तर घडवून आणता येईल. परंतु वक्तव्य काय द्यावे हा विचार करावा लागेल.' श्री गुरुजी म्हणाले, 'प्रार्थनेनंतर चहाचे वेळी हा विषय बोलू.'

पूजनीय ताई जिवंत असेपर्यंत श्री गुरुजींचा असा एक क्रम असे की राहणे, झोपणे कार्यालयात ठेवायचे परंतु सकाळचे स्नान व चहा, दुपारचे भोजन आणि प्रार्थनेनंतरचा संध्याकाळचा चहा हा मात्र ताईंच्या उपस्थितीत त्यांच्या नागोबाच्या गल्लीतील घरात करावयाचा. हा क्रम सर्वांना माहिती होता. त्यामुळे अगदी अनौपचारिक रीतीने श्री गुरुजींच्या भेटीची इच्छा करणारे कोणीही त्यावेळी नागोबाच्या गल्लीतील घरात येत असत व श्री गुरुजींच्या बरोबर चहा घेत.

सायंकाळच्या चहाचे वेळी श्री गुरुजींनी हसत विचारले, 'काय स्टेटमेंट तयार झाले?' मी म्हटले, ' नाही'. ते म्हणाले, 'का ?' मी म्हटले, 'योग्य शब्द योजना ध्यानात येत नाही.' श्री गुरुजींनी कागद मागवला, मला दिला व लिहिणे सुरू करायला सांगितले. अथपासून इतिपर्यंत संपूर्ण स्टेटमेंट श्री गुरुजींनी डिक्टेट केले. स्वल्पविराम, पूर्णविरामासहित. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे होता.

'बी.एम.एस. ही प्रखर राष्ट्रवादी मजूर संघटना आहे. त्यामुळे देशाच्या उत्पादनात व निरनिराळ्या सेवांमध्ये मुळीच खंड पडू नये अशीच आमची भूमिका आहे. आम्ही उत्पादकता वृद्धीच्या पक्षाचे आहोत, तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यदक्ष असावे असा आमचा आग्रह आहे. परंतु सरकारने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचा संपाचा अधिकार

हिरावून घेण्याची जी घोषणा केली आहे तिचा बी.एम.एस. तीव्र शब्दात निषेध करीत आहे. 'राईट टू वर्क' याला आम्ही फंडामेंटल राईट मानतो व त्याचीच कॉरोलरी राईट नॉट टू वर्क ही आहे. त्यामुळे संपाचा अधिकार हिरावून घेणे म्हणजे कर्मचाऱ्यांना त्यांच्या फंडामेंटल राईटपासून वंचित करणे आहे. धिस इज हायली अनडेमॉक्रेटिक. 'Instead the Govt. should devise a disputes settlement machinery which will render the right to strike a superfluity'

हे वक्तव्य संघाच्या सर्व साप्ताहिकात व बाहेरच्याही काही वृत्तपत्रांत प्रकाशित झाले.

त्यानंतरच्या झालेल्या प्रांत प्रचारकांच्या बैठकीत या वक्तव्याचा प्रश्न उपस्थित झाला. ही बैठक श्री गुरुजींच्या कार्यालयातील व्यक्तिगत भागाच्या जागेत होती. नेहमीप्रमाणे श्री गुरुजी आपल्या डेस्कच्या मागे बसले होते. बैठकीतील लोक समोर होते. मा. बाळासाहेब देवरस बैठक कंडक्ट करीत होते.

बैठकीच्या प्रारंभीच एक अति सिनिअर प्रचारक, ज्यांना काही विषयांत मीही गुरुस्थानी मानतो - श्री बाळासाहेबांना संबोधित करून एकदम उसळून म्हणाले, 'आपण आपल्या प्रचारकांना विभिन्न क्षेत्रात काम करण्याकरता पाठवितो. उद्देश्य हाच असतो की संघाच्या विचारांचा व संस्कारांचा ठसा त्या कार्यक्षेत्रावर उमटावा, पण इथे उलटा प्रकार झाला आहे. आपण श्री. दत्तोपंतांना मजूर क्षेत्रात पाठविले. परंतु दु:खाने असे म्हणावे लागते की स्वस्त लोकप्रियतेच्या मोहात पडून तेही वाहात चालले आहेत. He is trying to oust the communist. असेच करण्याकरता आपण जर आपले प्रचारक देणार असू तर त्यापेक्षा निरनिराळ्या क्षेत्रात काम प्रारंभ न करणेच बरे.'

त्यावर इतरांनी त्यांचेकडे विचारपूस केली कारण काहींच्या पाहण्यात ते वक्तव्य आले नव्हते. माहिती पुरवताना ते अत्यंत आवेशाने बोलत होते. ज्याचा मतलब हाच होता की श्री. दत्तोपंतही स्वस्त भावनांच्या आहारी गेलेले आहेत.

माझ्यासमोर प्रश्न होता. वस्तुस्थिती ही होती की स्वल्पविराम, पूर्णविरामसहित ते वक्तव्य स्वत: श्री गुरुजींनी डिक्टेट केलेले होते. परंतु मजूर क्षेत्रातील बारकावे माहिती नसल्यामुळे एकंदर संपूर्ण संघ क्षेत्रात तोपर्यंत तरी हीच भावना होती की 'संप करणे हे कम्युनिस्टांचे काम आहे व राष्ट्रभक्तांनी सर्व संपांना विरोध केलाच पाहिजे.' चर्चा चालली असताना श्री गुरुजी डेस्कवर दोन्ही ढोपर टेकवून व डोळ्यावर हात ठेवून स्वस्थपणाने

श्रवणभक्ती करीत होते. चर्चा थोडी कमी झाल्यावर मूळ प्रश्नकर्त्याने श्री. बाळासाहेबांकडे पाहून आवेशाने म्हटले की, 'हे काय आहे ? आम्ही इतके बोलून राहिलो श्री. दत्तोपंत त्याची दखलही घेत नाहीत.'

यावेळी फास्ट थिंकिंगची आवश्यकता होती. श्री गुरुजी समोरच होते व ते वर लिहिलेल्या पोझिशनमध्ये बसलेले होते. मी उठून म्हणालो की, 'हे वक्तव्य मी प्रकाशित केले. मी एक ज्युनियर प्रचारक आहे. वक्तव्याच्या मागे स्वस्त लोकप्रियतेचा मोह ही गोष्ट नव्हती. एक राष्ट्रवादी कार्यकर्ता या नात्याने मला जे योग्य वाटले, ते मी लिहिले परंतु मी ज्युनियर प्रचारक आहे. आपण माझ्यापेक्षा कितीतरी सिनियर प्रचारक आहात तेव्हा संघाच्या दृष्टीकोनातून कोणता विचार योग्य आहे हे अधिकृतपणे सांगण्याचा अधिकार तुम्हासच आहे, मला नाही आणि आता तुम्ही जर म्हणत आहात की प्रकाशित झालेला विचार संघाचे दृष्टीने चुकीचा आहे तर मी एवढेच म्हणेन की मी माझी चूक स्वीकार करतो.'

या संपूर्ण अवधीत श्री गुरुजी केवळ वरील पोझिशनमध्ये श्रवणभक्तीच करीत होते.

*****

श्री गुरुजींच्या मृत्यूच्या एक दीड महिना आधी, एप्रिल १९७३ मध्ये मी नागपूरला असताना श्री प्यारेलाला बेरींचे पत्र व टेलिग्राम दोन्ही आले. त्यात म्हटले होते की एप्रिलच्या अमुक तारखांना हिमाचलप्रदेशच्या सर्व युनियन्सना आम्ही संमेलनात बोलावले आहे. तिथे प्रांतिक भा.म.संघाची बॉडी गठित करण्यात येईल. तेव्हा तुम्ही ताबडतोब इथे या.

त्यानंतर मी जाण्याची तयारी केली व निरोप घेण्याकरता म्हणून श्री गुरुजींकडे गेलो. त्यांनी विचारले, 'कुठे चाललात ?' मी त्यांना पत्राची व टेलिग्रामची माहिती दिली. त्यावेळीही ते अत्यवस्थ स्थितीतच होते. त्यांनी विचारले, 'त्या प्रदेशात तुमच्या युनियन्सची आणि सदस्य संख्या किती आहे ?' मी सांगितले की युनियन्सची संख्या आठ आहे व सदस्य संख्येची मला नेमकी माहिती नाही. श्री गुरुजी म्हणाले, "तुम्ही जात आहात तर जा, पण एका गोष्टीची काळजी मात्र घ्या, जी बॉडी गठन होईल तिची संख्या कमीत कमी असावी. सर्व पदाच्या जागा आताच भरण्याची घाई करू नये, कॉन्स्टिट्यूशनमध्ये तीन उपाध्यक्ष असतील तर एकच उपाध्यक्ष भरायचा व दोन जागा रिकाम्या ठेवायच्या अशा प्रकारे कमीत कमी लोकांना पदाधिकारी करा व बॉडी लहान ठेवा."

संमेलनात माझ्याबरोबर त्यावेळी तिकडील क्षेत्र प्रमुख म्हणून श्री. अग्गीजीही होते.

कार्यक्रमाच्या योजनेत श्री. प्यारेलाला बेरींनी अशी व्यवस्था केली होती की ज्यावेळी संध्याकाळी संमेलनात बॉडी गठन करण्यात येईल त्याचवेळी मला तिथून काही किलोमीटर दूर असलेल्या शहरात, आधीच प्रसिद्ध केलेल्या प्रबुध्द नागरिकांच्या मिटींगला उपस्थित ठेवायचे. याचा अर्थ असा होता की बॉडी गठन करण्याच्या वेळी मी उपस्थित राहू शकणार नव्हतो व श्री. अग्गीजींनीच ते काम पाहायचे होते.

या योजनेमुळे मी डिस्टर्ब्ड होतो. परंतु माझ्या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका आधीच वाटल्या गेल्या असल्यामुळे तो कार्यक्रम वेळेवर रद्द करणे शक्य नव्हते म्हणून नाईलाजाने संमेलन स्थळ सोडताना मी श्री. अग्गीजींना श्री गुरुजींनी दिलेली सूचना सांगितली व म्हटले की, 'ही सूचना स्ट्रिक्टली अंमलात येईल हे तुम्हास पाहावे लागेल.'

मी तिकडून परत आल्यानंतर श्री. अग्गीजींची भेट झाली त्यावेळी त्यांचा चेहरा उतरलेला होता. ते म्हणाले की, 'तुम्ही सांगितलेल्या सूचनेप्रमाणे घडवून आणण्याचा मी आपल्याकडून पूर्ण प्रयत्न केला, पण असे लक्षात आले की श्री. प्यारेलाल व त्यांचे मित्र यांनी याविषयी आधीच कारस्थान केलेले होते व त्याप्रमाणे कॉन्स्टिट्यूशनमध्ये दिलेल्या पदाधिकाऱ्यांच्या सर्व जागा भरण्यात आल्या व बॉडीतील लोकांची संख्या एकूण ३१ झालेली आहे परंतु मला खेद आहे की मी हे सर्व थांबवू शकलो नाही.'

तिथून नागपूरला परतल्यानंतर श्री गुरुजींना प्रणाम करण्याकरता गेलो तेव्हा ते हसून म्हणाले की, 'काय तुम्ही माझी सूचना अंमलात आणू शकला नाहीत ना ?' मी लाजेने खाली मान घालून बसलो. नंतर ते म्हणाले, 'माझी सूचना अंमलात आणणे तुम्हाला जमणार नाही याची मला पूर्ण कल्पना होती.'

******

दि. २० ऑगस्ट १९६३ ला 'मुंबई बंद'चे आवाहन एच.एम.पी व ए.आय.टी.यु.सी. यांनी संयुक्तपणे केले होते. त्यावेळी श्री गुरुजी नागपूरला होते. मी दौऱ्यावरून परत आल्यावर त्यांनी मला विचारले की, 'सोशॅलिस्ट कम्युनिस्टांच्या या मूव्ह विषयी तुम्ही काय भूमिका घेणार ?' मी म्हटले, 'आम्ही कोणतीही भूमिका घेण्याच्या स्थितीत नाही. कारण आपले एकूण काम हे फार थोडे आहे व मुंबईत तर आपली सदस्य संख्या १५,००० ही नसेल. फर्नांडिसकडे मोठमोठ्या युनियन्स आहेत आणि कित्येक मोठ्या उद्योगात कम्युनिस्टांचे काम जुने व मजबूत आहे. बी.एम.एस. कुठेही चित्रात नाही. त्यामुळे

आम्ही काय भूमिका घेतो याला काहीही महत्त्व राहात नाही.' श्री गुरुजी म्हणाले, 'आज तुमचे काम फार कमी आहे हे खरे, परंतु पुढे ते वाढवायचे आहे ना ? आणि ही सोशॅलिस्ट कम्युनिस्टांची युती कायम राहिली व दोघांनी मिळून 'मुंबई बंद'चा कार्यक्रम यशस्वी केला तर त्याचा संघटनात्मक लाभसुद्धा खचत चाललेल्या आयटकलाच होईल. सोशॅलिस्टांच्या हे लक्षात येत नाही की हा कार्यक्रम यशस्वी झाला तरी त्याचा फायदा घेण्याच्या स्थितीत ते राहणार नाहीत. उलटपक्षी फर्नांडिसच्या शक्तीच्या भरवशावर कम्युनिस्टांना नवीन लीज ऑफ लाइफ मुंबईत मिळेल. याचा तुम्हाला पुढे फार त्रास होईल यादृष्टीने ही युती तोडणे तुमच्या दृष्टीने आवश्यक आहे.'

मी विचारात पडलो. बंदला कॉल देण्याचा विचार एच.एम.पी. चा, एच.एम.पी.च्या मागण्यांकरता, विशेषत: त्यावेळी कारागारांत असलेल्या फर्नांडिसच्या सुटकेच्या मागणीकरता होता व त्यात पूर्ण समर्थन देण्याचे कॉम्रेड डांगे यांनी घोषित केले होते. इनिशिएटिव्ह एच.एम.पी.चा होता व त्यावेळी मुंबईमध्ये सर्वात अधिक व मजबूत काम एच.एम.पी.चेच होते. कम्युनिस्टांचे काम कमी होऊन राहिले होते. मुंबई बंद च्या निमित्ताने त्यांना फ्रेश लीज ऑफ लाइफ मिळणार हे नक्की होते.

हे सर्व मला पटत असले तरी माझ्यासमोर प्रश्न होता की जिथे आपले नाममात्र काम आहे तिथे अशा बलाढ्य संघटनांचे पुढारी आपले म्हणणे ऐकतील हे कसे शक्य आहे?

दुपारी चहाचे वेळी मी श्री गुरुजींना मनातील विचार बोलून दाखविला. ते म्हणाले की, 'ही युती तुटणे आवश्यक आहे, हे तुम्हाला पटते ना ? पटत असेल तर तसा प्रयत्न करायलाच हवा. कसेही करून ही युती तोडायचीच हा वन पॉईंट प्रोग्राम मनात ठेवून काम करायचे ठरविले तर आजच्या स्थितीतही मार्ग निघेल, तिथे गेल्यावर मार्ग लक्षात येईल. फक्त एक किंमत चुकवावी लागेल.' मी म्हटले 'ही किंमत म्हणजे काय?' श्री गुरुजी म्हणाले, 'तुमच्या जवळ शक्ती नसल्यामुळे बलशाली संघटनांच्या पुढाऱ्यांशी तुम्ही बोलणे कराल त्यावेळी तुमचा व्यक्तीगत अपमान होईल. तो मुळीच मनावर न घेता तुम्ही काम करीत गेलात तर ही योजना कशी सफल करायची हे निरनिराळ्या पुढाऱ्यांशी बोलताना स्वाभाविकपणे तुमच्या ध्यानात येत राहील.'

मी मुंबईत गेलो. 'मुंबई बंद'चे प्रमुख सूत्रधार श्री. मधु लिमये यांचेकडे एंगेजमेंट घेऊन गेलो. त्यांच्या कार्यालयातच ही बैठक झाली. त्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले. मी

म्हटले होते की तुमचा मुंबई बंदचा कार्यक्रम ठीक आहे, तो यशस्वी झालाच पाहिजे. परंतु या निमित्ताने यावेळी मागे हटत चाललेल्या कम्युनिस्टांना तुम्ही नवजीवन द्याल व पुढील काळात हे तुम्हालाच बाधकही होईल. श्री. मधू लिमये म्हणाले की, 'हे मलाही दिसते आहे. श्री. डांगेच याचा फायदा उठवतील हे मीही समजतो परंतु करणार काय ? कार्यक्रम तर यशस्वी झालाच पाहिजे. केवळ एच.एम.पी. च्या भरवशावर पूर्ण यश प्राप्त होऊ शकत नाही. म्हणून बाहेरच्या मदतीचीही आवश्यकता आहे आणि ही मदत देणारा श्री. डांगे खेरीज कोणीही तयार नाही त्यामुळे नाईलाजाने आम्ही ही युती केली आहे.'

मी म्हटले की, 'मुंबई बंद या कार्यक्रमाच्या पक्षाचा मी आहे. परंतु त्याकरता श्री. डांगेंव्यतिरिक्त इतरांची मदत घेता येईल. उदाहरणार्थ एच.एम.एस. त्यांच्याही रेल्वेमध्ये, डॉक अँड पोर्टमध्ये व इतरत्रही मोठ्या युनियन्स आहेत. तेव्हा कम्युनिस्टांना वगळून एच.एम.पी., एच.एम.एस., व्ही.टी.यु.सी., स्वतंत्र अशा सर्वांना बरोबर घेतले तर कार्यक्रम यशस्वी होऊ शकतो.

श्री. मधू लिमये हसून म्हणाले, 'दत्तोपंत क्षमा करा, तुमचा अधिक्षेप करण्याचा माझा विचार नाही परंतु मी एक प्रश्न सरळ विचारला तर तुमची पोझिशन ऑकवर्ड होईल, तो प्रश्न म्हणजे तुम्ही एवढ्या लंब्याचवड्या योजना सांगत आहात पण तुमच्या बी.एम.एस.ची शक्ती येथे किती आहे ? बी.एम.एस. मुंबईत अस्तित्वात तरी आहे का?'

मी शांतपणे उत्तर दिले की, 'तुमचे म्हणणे खरे आहे. आमच्याकडे १५००० सुद्धा मजूर नाहीत. परंतु राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने व तुमच्या एच.एम.पी.च्याही दृष्टीने डांगेंना चेक करणे आवश्यक आहे असे मला वाटते म्हणून हे सर्व बोलत आहे.'

श्री. लिमये म्हणाले, 'तुम्हाला मजूर क्षेत्राची माहिती नाही. तुम्ही एच.एम.एस. ची गोष्ट काढलीत, Do you know that I do not see eye to eye with their leaders, तेव्हा तुम्ही म्हणता तसे होणे शक्यच नाही.'

मी म्हटले की, 'एच.एम.एस., व्ही.टी.यु.सी व इतरांशी बोलणे करून असा संयुक्त मोर्चा बनू शकतो का हे पाहण्याचा मी प्रयत्न करू शकतो, जर आपली परवानगी असेल तर. असे होऊ नये की मी सर्वांशी बोलणे करायचे व शेवटी तुम्ही ही भूमिका घ्यायची की मी या लोकांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहायला तयार नाही. असे झाले तर माझी स्थिती विचित्र होईल.'

श्री. मधू लिमये म्हणाले की, 'असा संयुक्त मोर्चा बनवण्याचा विचार म्हणजे केवळ दिवास्वप्न मात्र आहे. एच.एम.एस. शी आमचा प्रत्येक स्तरावर विवाद आहे. ते ही गोष्ट मानायला तयार व्हायचे नाहीत. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे ही अशक्यप्राय गोष्ट घडून आली तर मी तुम्हाला वेळेवर तोंडघशी पाडणार नाही. त्या मोर्चात मी सामील राहीन परंतु 'मुंबई बंद'चा Charter of Demand HMP ने दिलेलाच राहील. त्यावरच सर्वांना एकत्र यावे लागेल आणि हे सगळे घडून आले तर मग मी डांगेंची युती तोडायला तयार आहे. परंतु मी मित्र म्हणून एकच सांगू इच्छितो की हा तुमचा exercise in fultility होणार आहे.'

ईश्वराच्या व श्री गुरुजींच्या कृपेने हा exercise यशस्वी झाला. संयुक्त मोर्चाची एक समिती गठित झाली. त्यात अध्यक्ष म्हणून श्री. मधु लिमये, जनरल सेक्रेटरी म्हणून श्री. एस. आर. कुलकर्णी आणि संघटनमंत्री व कोषाध्यक्ष म्हणून माझे नाव घोषित करण्यात आले. दि. २० ऑगस्टला 'मुंबई बंद'चा कार्यक्रम पूर्ण रुपेण यशस्वी झाला. त्यापूर्वी ५/६ दिवस आधी कॉम्रेड डांगे यांनी स्टेटमेंट काढून आम्ही या बंदमध्ये सामील होणार नाही असे वक्तव्य दिले होते. परंतु दि. १९ ला त्यांनी वक्तव्य दिले की आमचे ही पूर्ण समर्थन या बंदला राहील.

दि. २० रोजी बंदचा कार्यक्रम यशस्वी झाला व मजूरांची फार मोठी शोभायात्रा निघाली. तिची परिणती कामगार मैदान - (नरे पार्क) येथे सभेत होणार होती. मिरवणूक कामगार मैदानाच्या आसपास आली व मजूरांच्या घोषणा मैदानात ऐकू येऊ लागल्या. त्यावेळी आधीपासून ठरल्याप्रमाणे श्री. नानासाहेब गोरे अध्यक्षपद स्वीकारण्याकरता म्हणून मैदानात पोहोचले. त्यावेळी मी व मधू लिमये मंचाजवळ बोलत उभे होतो. श्री. नानासाहेबांना येताना पाहून आम्ही दोघे त्यांचेकडे गेलो, त्यांचे स्वागत केले व पुन्हा मंचाजवळ येऊन उभे राहिलो.

नानासाहेबांनी माझ्याकडे पाहिले. ते मला ओळखत होते. ते माझ्या देखतच श्री. मधू लिमयेंना म्हटले की, 'हे इथे कसे ?' श्री. मधू लिमये यांनी सांगितले की, 'हा मोर्चा बनवण्यात सगळा इनिशिएटिव्ह यांनीच घेतलेला होता.' त्यावर नानासाहेब म्हणाले 'ते काहीही असले तरी माझा हा नियम आहे की माझ्या अध्यक्षतेखाली मी कोणत्याही कम्युनॅलिस्टांचे भाषण होऊ देणार नाही. तेव्हा ठेंगडींचे भाषण होणार असेल तर मी येथूनच मागल्या पावली परत जातो.'

इकडे मिरवणूक मैदानाच्या अगदी जवळ येऊन पोहोचली होती. विचारविमर्श करण्यालाही वेळ नव्हता. श्री. मधू लिमये यांना नानासाहेबांच्या भूमिकेमुळे मनापासून दु:ख झाले. त्यांनी नानासाहेबांना सांगितले की यांचे भाषण होऊ न देणे हा अन्याय होईल. इतकी महत्त्वपूर्ण भूमिका यांची राहिली आहे. श्री मधू लिमये यांनी अगदी हृदयापासून नानासाहेबांना समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु नानासाहेबांनी आपली भूमिका सोडली नाही. इकडे मिरवणुकीने मैदानात प्रवेशही केला होता. काय करावे हे सुचेना. श्री. नानासाहेबांनी श्री. मधू लिमयेंस विचारले मी सभेत राहायचे की परत जायचे हे मला सांग. मधू लिमये हताश होऊन माझ्याकडे पाहात होते व डोळ्याने खूण करून विचारीत होते की आता काय करायचे ?

मला सुद्धा त्यांवेळी काहीही सुचले नाही.

मधू लिमयेंनीच तोडगा काढला ते म्हणाले, 'नानासाहेब आम्ही तुमची अट मानतो की तुमच्या अध्यक्षतेखाली श्री. ठेंगडींचे भाषण होऊ नये. परंतु एकूण प्रसंगाचा विचका होऊ नये म्हणून तुम्ही माझेही म्हणणे मान्य करणे आवश्यक आहे, नाहीतर गडबड होईल. आपण असे करू की मंडळी जमिनीवर बसल्यावर व तुम्ही अध्यक्षपद ग्रहण करण्यापूर्वी श्री. दत्तोपंतांनी मंचावरून प्रास्ताविक भाषण करावे व सभेच्या अध्यक्षपदाकरता त्यांनीच तुमचे नाव प्रस्तुत करावे व आपले भाषण संपवावे. असे केल्याने तुमच्या अध्यक्षतेखाली भाषण झाले असे होणार नाही व त्यांना मुळीच बोलू दिले नाही असेही होणार नाही.'

हे बोलणे संपेपर्यंत सर्व मंडळी आपापल्या जागेवर बसली होती. श्री. नानासाहेबांनी नाखुषीने हे म्हणणे मान्य केले. सभेसमोर मी प्रास्ताविक म्हणून एक संक्षिप्त भाषण केले व नानासाहेबांचा गौरवपूर्वक उल्लेख करून त्यांचे नाव अध्यक्षपदाकरता सुचविले. इतके झाल्यावर मी मागे खुर्चीवर जाऊन बसलो.

ही सर्व घटना लोकांना माहिती नव्हती. तरी यात आपल्या माणसाचा अपमान होत आहे हे बी.एम.एस. च्या सर्व कार्यकर्त्यांच्या ध्यानात आले होते. कार्यक्रमानंतर व दुसऱ्या दिवशी सर्व कार्यकर्ते आळीपाळीने भेटावयास आले. त्यांनी आपल्या भावना प्रकट केल्या. मी त्यांच्या भावनांशी सहमत आहे हे त्यांना सांगितले व त्याच बरोबर तिथे घडलेला सर्व प्रकारही सांगितला. तरी पण सर्वच मनाने व्यथित व रुष्ट होते.

मी त्यांना हे मात्र सांगणे योग्य नव्हते की श्री गुरुजींनी मला हे आधीच बजावले होते की बी.एम.एस. ची शक्ती नसल्यामुळे या सर्व प्रकारात मोठ्या पुढाऱ्यांकडून तुमचा व्यक्तीगत अपमान होईल. त्याचा विचार न करता आपली योजना अमलात आणावी लागेल.

*****

बी.एम.एस. च्या प्रारंभीच्या काळात जनसंघाच्या काही पुढाऱ्यांनी ही वृत्ती घेतली होती की बी.एम.एस. स्वत:ला जनसंघाची Wing म्हणून घोषित करीत नसेल तर जनसंघाचे विधायक कोणत्याही प्रकरणात बी.एम.एस.ला मदत करणार नाहीत. त्यामुळे, खास करून केंद्र सरकारच्या बाबतीत रिप्रेझेंटेशन करताना अडचणी उत्पन्न झाल्या होत्या. श्री गुरुजींना त्याची जाणीव होती. म्हणून त्यांनी पंडीत दीनदयाळजींना सांगितले की कोणत्या तरी राज्यातून ठेंगडींना राज्यसभेवर पाठवा. ते स्वत: जनसंघाचे सदस्य असावेत ही अट घालू नका. त्याकाळात श्री. एस. एम.बॅनर्जी यांचे Status - 'Independant sitting with Communist Group' असे असे. त्याच धर्तीवर यांचेही Status - Independant, sitting with Jan Sangh Group असे ठेवा. नागपूरवरून परत आल्यावर पंडीतजींनी मला सांगितले की मी राज्यसभेचा फॉर्म भरण्याकरता लखनौला जावे. पंडीतजींचे बोलणे पूर्वीच झाल्यामुळे त्यांनी आधीच मला कानपूरचा मतदार करण्याची व्यवस्था करून ठेवली होती.

२७ डिसेंबर १९६३ ला मला पंडीतजींनी हे सांगितल्यावर फार आश्चर्य वाटले. लखनौ करता प्रयाण करण्यापूर्वी मी श्री गुरुजींना एका वाक्याचे पत्र लिहिले. ते वाक्य हे की, 'Thy will be done, My Lord, Not mine'

लखनौला गेल्यानंतर राज्यसभेच्या निवडणुकीत मला सुखरुपपणे निवडून आणण्यात आले. त्यावेळी नागपूरला संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभेची बैठक होती. निवडणूक संपल्यानंतर व निकाल जाहीर झाल्यानंतर मी नागपूरला परतलो. तो प्रतिनिधी सभेचा शेवटचा दिवस होता.

मोहिते वाड्याच्या समोरच्या शाखा प्रांगणात मोठा शामियाना टाकलेला होता. त्यातच जेवण, नाष्टा आदीची व्यवस्था होती. स्नान, जेवण आटपून दुपारच्या चहाच्या वेळी मी शामियान्यात गेलो व श्री गुरुजींना प्रणाम केला आणि त्यांच्या समोरच्या

रांगेत जाऊन बसलो. चहा संपवून मंडळी एकेक करून उठून जायला लागली. त्यावेळी श्री गुरुजींनी खुणेनेच मला थांबायला सांगितले. मंडळी गेल्यानंतर जवळ बोलावून बोलायला सुरुवात केली.

श्री गुरुजी : 'काय दत्तोपंत ! 'मेंबर ऑफ पार्लमेंट' होऊन आलात ! अभिनंदन !'

मी काहीच बोललो नाही.

गुरुजी : 'अरे बाबा ! हे क्षेत्र फार कठीण असते. स्वयंसेवकाला या क्षेत्रात पाठविल्यानंतर सुरुवाती-सुरुवातीला आपला जयजयकार ऐकताना व लोकांनी दिलेले हार गळ्यात घालून घेताना त्याला संकोच होतो. परंतु पुढे पुढे हा संकोच कमी होत जातो व अशी पाळी येते की एखाद्या स्टेशनवर भेटायला आलेल्या मंडळींनी फुलांचा हार आणला नाही तर मानेमध्ये, पाठीमागच्या भागात काहीतरी दुखते आहे असे त्यास वाटू लागते. फार कठीण क्षेत्र आहे. पण तुम्हाला त्याचा त्रास होणार नाही म्हणा. कारण तुम्ही आधीपासूनच सार्वजनिक क्षेत्रात आहात. बरें ते असो ! पण हे सांगा की आता एम. पी. झाल्यावर तुम्ही काय करणार ?'

मी म्हटले की, 'मी कोण ठरवणार ? तुमच्याच योजनेने मला एम. पी. करण्यात आले तेव्हा त्याचा विचार मी करण्याचे कारणच नाही.' नंतर एकदीड मिनिटे थांबून श्री गुरुजींनी बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले की, 'तुम्हाला राज्यसभेत पाठविण्याची सूचना माझीच होती. त्यात माझे दोन हेतू होते. एक तर त्यामुळे भारतीय मजदूर संघाच्या कामाला मदत व्हावी. आज त्याकरता कोणत्या ना कोणत्या एम. पी. च्या तोंडाकडे पाहावे लागते. तशी पाळी येऊ नये. एक टर्म तुम्ही एम. पी. राहिलात, की त्या अवधीत तुमच्यामुळे सरकारशी संबंधित बी.एम.एस.ची कामेही होतील व ६ वर्षांच्या दीर्घ अवधीत मंत्री, सेक्रेटरी, देशातील प्रमुख लोक यांच्याशी तुमचा एकदा परिचय व संबंध आला की पुन्हा तुम्ही एम.पी. म्हणून न आलात तरी काही बिघडणार नाही. कारण परिचय व संबंध निर्माण झालेला असेल. हे एक Consideration माझ्या मनासमोर होते.

दुसरेही एक Consideration होते ते तुम्हाला कितपत रुचेल याची मला कल्पना नाही. तुम्हाला हे म्हणणे पटले तर पाहा - न पटले तर सोडून द्या. माझा आग्रह नाही. परंतु काही झाले तरी हा विचार तुमच्याकडून बाहेर मात्र जाऊ नये.

I have a feeling that in the, not - too - distant future, देशावर हुकूमशाहीची आपत्ती येणार आहे व त्यावेळी कोणताही एक विरोधी पक्ष हुकूमशाहीचा

प्रतिकार करण्याच्या स्थितीत असणार नाही. अशा स्थितीत आपसात भांडणे असूनही निरनिराळ्या विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांना असे वाटेल, की हुकूमशाहीच्या विरुद्ध लढा देण्याकरता सर्वांनी, मतभेद तात्पुरते दूर सारून, जवळ येण्याची आवश्यकता आहे. त्यावेळी हा प्रश्न निर्माण होईल की हे काम कोण करील ? कारण सर्वच पुढाऱ्यांची वृत्ती पार्टीझनशिपची असल्यामुळे कोणाही एका पक्षाच्या पुढाऱ्यावर दुसऱ्या पक्षाचा पुढारी विश्वास ठेवणार नाही. अशा स्थितीत कॉमन लिंक बनू शकणाऱ्या माणसाची आवश्यकता राहील. माझी इच्छा अशी आहे की हे काम त्यावेळी तुम्ही करावे. परंतु त्याकरता तुम्हाला काही त्याग करावा लागेल.

तुम्ही आता पार्लमेंटमध्ये आला आहात त्या वातावरणात उत्तम पार्लमेंटरीयन म्हणून चमकले पाहिजे अशी इच्छा तुमच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. उत्तम पार्लमेंटरीयन म्हणून चमकण्याकरता पब्लिसिटीची आवश्यकता आहे व पब्लिसिटी नेहमी सेन्सेशनल व कॉन्ट्राव्हर्शीअल अशाच बाबींना मिळते. अशा बाबी राजकीयच असतात. इतर गैरराजकीय बाबी इतक्या सेन्सेशनल क्वचितच बनतात. तुम्ही मनात आणले तर अशा इश्यूजवर बोलण्याकरता लागणारा अभ्यास तुम्ही करू शकता व त्यावर पार्लमेंटमध्ये भाषण करून पब्लिसिटीही मिळवू शकता. ही तुमची क्षमता आहे. परंतु तुम्ही जर याच्या मागे लागलात तर अपरिहार्यपणे तुम्हाला विवादास्पद राजकीय प्रश्नांवर बोलावे लागेल व त्यामुळे in course of time तुमची इमेज पार्टीझन्स स्पिरीटची होईल. अशी इमेज झाल्यावर संकटाच्या काळी सर्व पक्षांशी कॉमन लिंक होण्याची भूमिका तुम्ही घेऊ शकणार नाही. कारण इतर पक्षांचे पुढारी तुम्हाला कट्टर जनसंघी म्हणूनच पाहतील. परंतु तुम्ही संघाचे आहात हे सर्वांना माहित असले तरी व तिथे जनसंघ ग्रुपबरोबर तुम्ही बसत असलात तरी तुम्ही जर अशा राजकीय विषयांवर न बोलण्याचे ठरविले व फुरसतीच्या वेळी सर्व पक्षांच्या लोकांशी व्यक्तिगत संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर तुमची इमेज भिन्न प्रकारची तयार होऊ शकेल. हा संघाचा आहे, जनसंघाचा आहे, परंतु इतरांप्रमाणे पार्टीझन नाही असे इंप्रेशन सर्वांचे राहील. त्यामुळे सर्वांशी संबंध ठेवून त्यांना एकत्र आणणे अधिक सुलभ होईल. परंतु त्याकरता जो त्याग करावा लागेल तो करावा की करू नये हा निर्णय तुम्हालाच घ्यायचा आहे. कारण राजकीय प्रश्नांवर बोलायचे नाही असे ठरवले तर ज्या इतर प्रश्नावर तुम्ही बोलू शकाल ते सर्व मिळमिळीत राहतील. प्रेस त्याची

दखल घेणार नाही, त्यामुळे पार्लमेंटरीयन म्हणून प्रसिद्धी मिळणार नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून तुम्हीच निर्णय घ्यायचा आहे.'

त्यावर मी इतकेच म्हटले की, 'मी निर्णय घेणारा कोण ? तुमची जशी इच्छा असेल तसा वागेन.'

हे बोलणे १९६४ च्या मार्च महिन्याच्या शेवटच्या दिवसात झाले. १९७५ च्या जून महिन्यात इमर्जन्सी आली व दिनांक १२ डिसेंबर १९७५ या दिवशी मुंबई येथे श्री. रवींद्र वर्मा यांना पकडण्यात आल्यानंतर लोकनायक जयप्रकाशांनी लोकसंघर्ष समितीच्या सेक्रेटरीची जबाबदारी माझ्यावर सोपवली.

******

नागपूर संघचालक मा. बाबासाहेब घटाटे डॉक्टर मुंजे यांचे कट्टर भक्त होते. फार दिवसापासून त्यांच्या मनात होते की काही शहरात तरी डॉक्टर मुंजे यांचा पुतळा उभारला जावा. पुढे त्यांनी औपचारिकरित्या डॉक्टर मुंजे स्मारक समितीची स्थापना केली व श्री गुरुजींसमोर हट्ट धरून बसले की त्यांनी समितीची अध्यक्षता स्वीकारावी.

अशा ठिकाणी स्थान ग्रहण करणे श्री गुरुजींच्या स्वभावात व योजनेत बसत नव्हते म्हणून त्यांनी नकार दिला. परंतु बाबासाहेबांचा हट्ट इतका राहिला की स्वत:च्या इच्छेच्या विरुद्ध जाऊन त्यांचे म्हणणे श्री गुरुजींना मान्य करावे लागले. हे करण्याकरिता एकच कन्सिडरेशन त्यांच्या मनासमोर होते, ते म्हणजे प. पू. डॉक्टर हेडगेवार यांच्याशी असलेले बाबासाहेबांचे संबंध व डॉक्टरांच्या शेवटच्या दिवसात बाबासाहेबांनी केलेली त्यांची निष्ठापूर्वक सेवा. यामुळे गुरुजींनी होकार दिला. त्यानंतर श्री गुरुजी दिल्लीस आले असताना जनसंघाच्या काही एम.पी.ज् बरोबर झेंडावालावर त्यांचे चहापान झाले. त्यावेळी बोलताना श्री गुरुजींनी या समितीची माहिती दिली व सांगितले की तुम्ही श्री जगजीवनरामजींच्या कडे जाऊन त्यांना ही माहिती द्या व समितीतर्फे त्यांना विनंती करा की त्यांनी समितीची सदस्यता स्वीकारावी व समितीतर्फे मदतीकरता जे निवेदन प्रकाशित करावयाचे आहे त्यावरही सही करावी.

हे ऐकल्यानंतर आमचे जनसंघ एम.पी. मित्र एकदम आवेशाने म्हणाले, 'तो काय ही विनंती मान्य करतो आहे ? हा विषय त्याच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही. आम्ही बोललो तरी श्रीमती इंदिरा गांधींच्या भीतीमुळे तो नकारच देणार आहे. तेव्हा उगीचच आपला शब्द टाकणे व्यर्थ आहे.'

त्यावर श्री गुरुजी काही बोलले नाहीत. मंडळी जायला उठल्यानंतर त्यांनी मला थांबण्याचा इशारा केला. मंडळी गेल्यावर ते मला म्हणाले, 'तुम्ही जगजीवनरामजींकडे जा व त्यांच्याशी हा विषय बोला.'

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेदहाचे सुमारास मी टॅक्सी घेऊन श्री. जगजीवनराम यांचेकडे गेलो. आमचे व्यक्तिगत संबंध इतके जवळचे होते की एंगेजमेंट न घेताही मी त्यांचेकडे जाऊ शकत असे. ते कामात असले की स्वाभाविकपणे वाट पाहणे सज्जनपणाचे असे. परंतु ते मोकळे असले तर बिनदिक्कत सरळ त्यांच्या खोलीत जाता येत असे. त्यामुळे आधी फोन न करताच मी सरळ गेलो.

त्यावेळी पोर्चमध्ये त्यांची गाडी उभी होती व ते गाडीत चढण्याकरता वऱ्हांड्याच्या पायऱ्या उतरत होते. मला पाहून ते म्हणाले, 'अरे आप अभी आ गए है ? मै तो दफ्तर जानेके लिए निकला. कुछ अर्जंट काम था । अब क्या किया जाय ।' मी काही बोललो नाही. नंतर तेच म्हणाले की, 'तुमचा विषय लंबा असेल तर संध्याकाळी या. पण विषय लहान असला तर तुम्ही माझ्या बरोबर गाडीत बसा व तिथे जाईपर्यंत आपले बोलणे संपेल.'

मी गाडीत बसलो व अपॉलॉजिटिकली विषय मांडायला सुरुवात केली. डॉक्टर मुंजे स्मारक समिती, गुरुजी अध्यक्ष तरीपण संघाशी संघटनात्मक संबंध नाही वगैरे वगैरे. माझे बोलणे मध्येच थांबवून ते म्हणाले, 'अरे भाई, इतनी लंबी कहानी सुनाने की कोई जरुरत नही, आप क्या चाहते है सीधे बताओ !' मी समितीची विनंती त्यांना सांगितली. ते म्हणाले, 'मुझे एक ही बात बताओ आप श्री गुरुजी का यह संदेश लेकर मेरे पास आए है क्या ? आप जो कह रहे है वह आपके मनकी बात है या श्री गुरुजी का संदेश है ।' मी म्हटले, 'ही गुरुजींची इच्छा आहे.' ते म्हणाले की, 'उनकी इच्छा है, तो मै वैसे करुंगा, मेरे पास समिती की सदस्यता का फॉर्म और साहाय्यता की अपील दोनो भेज दीजिए । मैं हस्ताक्षर करके वापीस भेजूंगा ।'

मी हे आमचे संभाषण श्री गुरुजींना सांगितले. त्यांनी ताबडतोब बाबासाहेबांना फोन लावला. त्यांचेकडून दोन दिवसात सदस्यतेचा फॉर्म व निवेदनाची प्रत परस्पर जगजीवनरामजींकडे गेली. त्यांनी दोन्ही दस्तावेज हस्ताक्षर करून परस्पर बाबासाहेबांकडे पाठविले व त्यांचे हस्ताक्षर दोन्हीवर आज झाल्याची बातमी दिल्लीला श्री गुरुजींना दिली.

त्यानंतर गुरुजी मला म्हणाले की, 'ही घटना, ही बातमी तुम्ही तुमच्या एम.पी.

मित्रांना देऊ नका. त्यांचा त्यावर विश्वास बसायचा नाही. परंतु निवेदन ताबडतोब छापायला टाकले आहे. ते छापून आल्यावर ती छापील प्रत तुमच्या एम. पी. मित्रांना तुम्ही द्या.'

त्याप्रमाणे निवेदन छापून आले त्यात समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. मा. स. गोळवलकर हे नाव होते व सदस्य म्हणून खाली सही करणाऱ्यात श्री. जगजीवनराम यांचे नाव होते ते मी माझ्या एम. पी. मित्रांना दाखविले. त्यांनी आश्चर्य प्रकट केले.

*****

बी. एम. एस. च्या प्रारंभिक अवस्थेत नागपूरला एक इंडिपेंडंट युनियन काम करीत होती. तिच्या पुढाऱ्याचे नाव होते श्री.एन. एच. श्रोते. ती मँगेनीज मजुरांची युनियन होती. हा गृहस्थ फार चतुर होता. आपली युनियन कोणत्याही केंद्रीय संस्थेशी संलग्न करायची नाही, परंतु सर्व केंद्रीय संस्थांना झुलवत ठेवायचे. ही लालच दाखवायची की या युनियनला आपण आता मदत केली की या Goodwill मुळे ही युनियन आपल्याशी संबद्ध होईल. दर संकटाच्या वेळी तो सर्व केंद्रीय श्रम संघटनांच्या नागपूर येथील पुढाऱ्यांना बोलावीत असे व वरील आशेमुळे सर्व त्याच्या मदतीकरता धावूनही जात असत. परंतु कालांतराने त्याची ही चलाखी सर्वांच्या ध्यानात येऊन चुकली. हे स्वत: श्रोते यांच्या ध्यानात आलेले नव्हते.

अशा स्थितीत त्यांनी मँगेनीज मजुरांच्या काही मागण्यांसाठी नागपूरच्या गव्हर्नर्स बंगलोसमोर एका वनवासी मँगनीज मजुराला प्राणांतिक उपोषणासाठी बसविले. मँगनीज क्षेत्रात त्याकाळी वनवासी मजुरांचीच संख्या जास्त असे व ते साधारणत: एकाच बिरादरीचे असत. एकाने अनशन सुरू केल्यानंतर फार मोठ्या संख्येने वनवासी मँगनीज मजुरांनी तेथे येऊन बसायला सुरुवात केली. अर्थात ते जाऊन येऊन असत.

उपोषण सुरू केल्यानंतर सवयीप्रमाणे श्रोते यांनी सर्व केंद्रीय श्रम संस्थांना पत्रे पाठविली व त्या स्पॉटवर येण्याची, तसेच समर्थनपर पत्रक काढण्याची त्यांना विनंती केली. त्यांना आशा होती की नेहमीप्रमाणे सर्वच तिथे येतील व समर्थनपर पत्रकेही काढतील. परंतु त्याची चलाखी समजून चुकलेले अन्य संघटनांचे कोणीही पुढारी त्यांचे इच्छेप्रमाणे वागले नाहीत. त्यामुळे श्री. श्रोते यांना निराशा वाटू लागली. इकडे उपोषणाचे दिवस वाढत चालले. त्यांनी उपोषणकर्त्याला व अन्य मजुरांना असे सांगितले होते की आपल्याला हे उपोषण फार दिवस चालवावे लागणार नाही. सर्व युनियन्सचे लोक आपल्या मदतीला येतील व त्या दबावामुळे आपल्या मागण्या मान्य करणे मॅनेजमेंटला भाग पडेल.

इकडे उपोषण लांबत चालले. बाहेरून कोणत्याही संस्थेचे पुढारी ऑन दि स्पॉट गेले नाहीत किंवा त्यांनी समर्थनपर पत्रकेही काढली नाहीत. मजूर हे सर्व पाहात होते व श्रोतेंना विचारत होते की, 'कुठे आहेत तुमचे बाकीचे पुढारी ? तुम्ही आमच्या माणसाला मारणार की काय ?' कारण १० दिवसानंतर डॉक्टरांनी सांगितले होते की हा फार काळ तग धरू शकणार नाही. मजुरांना तोंड देता देता श्री. श्रोते यांच्या नाकेनऊ आले होते.

अशा वेळी अकराव्या दिवशी ते मला घेऊन जाण्याकरता संघ कार्यालयात आले. माझ्यामुळे श्री गुरुजींशी व कार्यालयातील लोकांशी त्यांची ओळख होतीच. मी कुठे आहे म्हणून त्यांनी विचारणा केली श्री गुरुजी बाहेरच उभे होते. त्यांना श्रोते यांनी आपल्या येण्याचा हेतू सांगितला व म्हटले की, 'दत्तोपंत नागपूरात नाहीत ही फार पंचाईत झाली आहे. तिथे काही 'शे' मजूर ठाण मांडून बसले आहेत. बाहेरचा कुणीही येत नाहीये. मजूर फार चिंतेत आहेत. अशावेळी त्यांचे धैर्य कायम ठेवण्याकरता दत्तोपंतांच्या भेटीची फार मदत झाली असती. त्याहीपेक्षा स्वत: उपोषणाला बसलेल्या मजुराच्या मन:स्थितीच्या दृष्टीनेही ते फार उपकारक झाले असते. पण आज काही उपयोग नाही' असे म्हणून ते जायला निघाले.

परंतु मोहिते वाड्याचे अंगण ओलांडण्याच्या पूर्वीच ते मागे परतले. गुरुजी बाहेर अंगणातच उभे होते. त्यांच्याजवळ जाऊन ते म्हणाले की, 'माझ्या मजबुरीमुळे माझ्या मनात एक कल्पना आली आहे. मला माहिती आहे की मी जे म्हणतो आहे ते तुमच्या मर्यादांमध्ये बसत नाही, परंतु मला अशीही आशा आहे की मजूर चळवळ वगैरे बाबी सोडल्या तरी केवळ मानवता या दृष्टीने तुम्ही त्या उपोषणाला बसलेल्या मजुराची कल्पना करू शकाल. तो फारच घाबरलेला आहे. केवळ मानवता म्हणून तुम्ही जर भेट दिली वा केवळ त्याच्या प्रकृतीची चौकशी केली तरी त्याचे व इतरांचे मनोधैर्य वाढेल. अर्थात मी ही विनंती करणे योग्य नाही हे मला समजते परंतु दुसरा काही मार्गही दिसत नाही.'

श्री गुरुजी म्हणाले, 'हा नवीन तऱ्हेचा प्रश्न आहे. मला विचार करावा लागेल. तुम्ही दुपारी ३.०० वाजता चहाचे वेळी या. मी येऊ शकतो किंवा नाही याचे उत्तर मी तुम्हाला त्यावेळी देईन.'

दुपारी चहाचे वेळी श्रोते सरळ स्वयंपाकगृहात आले. त्यांना पाहाताच गुरुजींनी त्यांना खुणावून चहा करता आपल्या बाजूस बसविले व कृष्णरावांना सांगितले की 'बाहेर जाण्याकरता मोटार तयार करायला सांगा.'

चहा आटोपल्यावर श्री गुरुजी कपडे बदलवून खाली आले व कृष्णरावांना बरोबर घेऊन श्री. श्रोते यांच्यासह उपोषणाच्या जागी जाऊन पोहोचले. त्यावेळी तिथे २५० तरी वनवासी मजूर होते.

तिथे गेल्यावर गुरुजी उपोषणकर्त्याच्याजवळ बसले. त्याच्या पाठीवरून हात फिरविला. त्याला सांगितले की, 'घाबरण्याचे कारण नाही.' त्याच्या प्रकृतीविषयीचे मेडिकल पेपर्स मागवले व ते पाहून सर्वांना सांगितले की 'फार चिंता करण्याचे कारण नाही.'

स्वत: गुरुजी येऊन पोहोचल्यामुळे तिथला माहोलच उजळून गेला. मजुरांनी सवयीप्रमाणे नारेबाजीही सुरू केली. श्रोते यांनाही मोह झाला. स्वत:चे इंप्रेशन बसविण्याचा म्हणून त्यांनी सर्वांचे देखत आपले मागणीपत्र श्री गुरुजींचे हाती दिले. श्री. गुरुजींनी वाचायला सुरुवात केली. वाचता वाचता एक मागणी त्यांच्या समोर आली, ती म्हणजे सर्व मँगेनीज मजुरांना एक दिवसाची सवेतन साप्ताहिक सुटी असावी. ते वाचल्यावर गुरुजी म्हणाले की हे काय आहे ? त्यांना अशी सुट्टी मिळत नाही की काय ? इतर सर्वच मजुरांना मिळाली पाहिजे. एवढे उद्‌गार काढून ते पुढील मागण्या वाचू लागले. थोडावेळ तेथे थांबल्यावर पुन्हा एकदा उपोषणकर्त्याच्या पाठीवर हात फिरवून व सर्वांचा निरोप घेऊन ते कार्यालयात परत आले.

श्रोते फार चलाख मनुष्य होता व त्यावेळी नागपूरात प्रचलित असलेले 'महाराष्ट्र' नावाचे वृत्तपत्र त्यांच्या संबंधात होते.

त्यानंतर चार दिवसांनी मी नागपूरला परत आलो. इंटकची मंडळी माझी वाट पाहात होती. त्यांनी मला विचारले, तुमचे गुरुजी आता मजूर क्षेत्रातही उतरणार की काय ? मी म्हटले, 'तसे तर काही नाही, का ?' त्यांनी मला 'महाराष्ट्रा'च्या पहिल्या पृष्ठावर मध्यभागी तीन कॉलम शीर्षक असलेली बातमी दाखविली. शीर्षक असे होते -

'साप्ताहिक सवेतन सुट्टी हा मँगनीज मजुरांचा अधिकार'

**- मा. स. गोळवलकर**

# एक आदर्श स्वयंसेवक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक हा संघ समर्पित कार्यकर्ता असतो. त्यांनी स्वत: होऊनच अनुशासन स्वीकारलेले असते. संघाच्या पदाधिकाऱ्यांची इच्छा हीच आज्ञा अशी त्याची धारणा असते. कै. दत्तोपंत ठेंगडी हे असे समर्पित आदर्श स्वयंसेवक होते. अलीकडे दोन-तीन वर्षे त्यांचे 'स्वास्थ्य' बिघडलेलेच होते. अनेकदा इस्पितळात मुक्काम करावा लागे. छोट्या छोट्या दोन-तीन शस्त्रक्रिया कराव्या लागल्या. त्यांचे प्रवास बैठका चालूच होत्या. अशावेळी त्यांनी एका जागी राहावे असे सर्व स्वयंसेवकांना/कार्यकर्त्यांना वाटे. म्हणून सरसंघचालकानीच त्यांना काही काम सांगावे अशी कल्पना आली. रा. स्व. संघाचे सर्वोच्च अधिकारी म्हणजे सरसंघचालक.

पंतांचा कै. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेला होता. त्यांचेसमवेत दत्तोपंतांनी चळवळीत प्रत्यक्ष सहभाग दिलेला होता म्हणून सरसंघचालक मा. सुदर्शनजी यांनी श्री. दत्तोपंतांना सुचविले की श्री. दत्तोपंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेसंबंधी एक पुस्तक लिहावे. या आजारपणात त्यांनी '**सामाजिक क्रांतीची वाटचाल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**' हे पुस्तक लिहून पूर्ण केले. टायपिंग इ. पूर्ण झाले. २००४ च्या दीपावलीत ते प्रकाशित करावे असे ठरलेले होते. श्री. दत्तोपंतांनी मा. सुदर्शनजींना कळविले तुम्ही सांगितलेले काम मी पूर्ण केलेले आहे. आता मी पूर्ण समाधानी आहे. पुस्तक प्रकाशनापूर्वीच त्यांचा देहांत झाला. असा हा एक आदर्श स्वयंसेवक.

# ध्येयनिष्ठ-समर्पित प्रचारक

भारतीय मजदूर संघाचे संस्थापक दत्तोपंत ठेंगडी यांच्या निधनाने समर्पित आणि अढळ निष्ठेच्या अधिष्ठानावर वसलेले व्यक्तित्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. संघसंस्थापक डॉ. केशव बळिराम हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांनी संघप्रसारासाठी देशाच्या कानाकोपऱ्यात ज्यांना पाठविले, ती सर्वच व्यक्तिमत्त्वे अलौकिक ठरली. उपजतच विलक्षण तडफ, कुशाग्र बुद्धिमत्ता, संकटातून मार्ग काढण्याची धमक आणि समाजाला कवेत घेण्याची क्षमता, या गुणांनी परिपूर्ण असणाऱ्या या कार्यकर्त्यांच्या संचामुळे संघाच्या कामाचा वटवृक्ष देशव्यापी विस्तारला. या कार्यकर्त्यांच्या सूचीत दत्तोपंत ठेंगडी यांचे स्थान फार वरचे होते. संघाचा ध्येयनिष्ठ-समर्पित प्रचारक याच्या पलीकडे संघविचारांचा तत्त्वचिंतक अशी मान्यता ठेंगडी यांनी मिळवली. मूलगामी चिंतन आणि घट्ट वैचारिक मांडणी यामुळे ठेंगडी संघप्रचारकांतही वेगळे स्थान मिळवणारे ठरले. कामगार संघटनेचे कार्य करण्यासाठी तुमचे विचार कम्युनिस्ट असावे लागतात. संघपरिवारातील नेते चौकटीत बंदिस्त असतात, हा समजही ठेंगडींनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून खोटा पाडला. 'संघ कार्यकर्ता अबोलपणे दिलेले आदेश अमलात आणत राहतो, त्याच्या शब्दकोशात विचारप्रक्रियेला स्थान नसते.' ठेंगडी यांनी याही समजाला साफ झूठ ठरविले. अखंड चिंतन, प्रचंड लेखन, सातत्याने भाष्य करीत ठेंगडी यांनी संघविचार केवळ हिंदुत्वाबद्दल बोलत नाही, तर जीवनाच्या प्रत्येक अंगाचा बारकाईने विचार मांडतो, हे आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्वातून दाखवून दिले. भारतीय तत्वज्ञानावर निष्ठा म्हणजे बुरसटलेपणा नव्हे, भारतीय जीवनपद्धती म्हणजे प्रतिगामीत्व नव्हे, याची वैचारिक मांडणी सातत्याने करणारा संघप्रचारक ही दत्तोपंतांची ओळख होती. या ओळखीतून दत्तोपंतांचे व्यक्तित्व उत्तुंग बनले आणि त्यातूनच त्यांनी संघटनेलाही आणखी उंची प्राप्त करून दिली. यातही 'व्यक्तीपेक्षा संघटना श्रेष्ठ' हा विचार नजरेआड होणार नाही, याचे भान सतत बाळगले.

गोळवलकर गुरूजी व दीनदयाळ उपाध्याय हे जीवनआदर्श असणा-या ठेंगडी यांनी भारतीय मजदूर संघाची स्थापना करून कामगार क्षेत्रात आपला अमीट ठसा उमटविला. भारतीय मजदूर संघ ही संघपरिवारातील कामगार संघटना काँग्रेसच्या राजवटीत देशातील

क्रमांक एकची संघटना बनली याचे मोल मोठे आहे आणि त्याचे श्रेय ठेंगडींचे आहे. कामगार चळवळीसाठी आपले आयुष्य झोकून द्यायचे ठरल्यावर संघाच्या कर्मठ मुशीतील या कार्यकर्त्याने चळवळ समजून घेण्यासाठी काँग्रेसप्रणीत इंटक व कम्युनिस्टप्रणीत आयटक या कामगार संघटनांत प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेतला. कम्युनिझमची कास न धरता कामगार चळवळी उभ्याच राहू शकत नाहीत, या समजाला त्यांनी छेद दिला. यात कम्युनिझमचा द्वेष त्यांना अभिप्रेत नव्हता, तर त्या त्या देशातील जीवनपद्धतीशी अनुरूप चळवळ उभी राहू शकते आणि टिकतेही, ही त्यांची धारणा होती. कामगार चळवळीलाही राष्ट्रवादाचे अधिष्ठान हवे, याचा आग्रह त्यांनी मांडला. मालक-नोकर या डाव्यांच्या विभागणीवर त्यांचा विश्वास नव्हता. मालकाने कामगारांचे हित जपले पाहिजे, त्याचप्रमाणे कामगाराने आपली कर्तव्ये चोख पार पाडायला हवीत, याचे आग्रही प्रतिपादन ठेंगडी यांनी प्रथम केले. खुल्या आर्थिक धोरणामुळे भारतात आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात जी उलथापालथ झाली, त्यावर ठेंगडी तुटून पडले. असे तुटून पडत असतानाही भावनिकदृष्ट्या ते प्रक्षुब्ध झाले नाहीत, तर वैश्विकीकरणाच्या पार्श्वभूमीवर स्वदेशी अर्थशास्त्राचा सिद्धांत त्यांनी गांभीर्याने मांडला. वर्गकलहाच्या आहारी जाऊन राष्ट्राचे विघटन होईल, हा विचार मांडून त्यांनी कामगार चळवळीतील डाव्या विचारांच्या विरोधात पर्याय उभा केला.

राजकारणाचा स्पर्श झाला की तत्वज्ञान पातळ होते, निष्ठा ढासळायला लागतात; लवचिकतेच्या नावाखाली हातमिळवणी सुरू होते. ठेंगडी यांचे जीवन याला अपवाद ठरले. संघ परिवारातील भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात आल्यावर त्यांनी या सरकारच्या आर्थिक धोरणांवर जबरदस्त हल्ले केले. स्वदेशी जागरण मंच ही त्यांचीच कल्पना. खासदारकीच्या कारकिर्दीत त्यांनी मांडलेले सर्व ठराव बिगर-राजकीय स्वरूपाचे होते. जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यावरही कामगारमंत्रिपद स्वीकारण्याची गळ त्यांना घातली गेली; पण हा प्रस्ताव त्यांना किंचितही लुभावू शकला नाही. आपले ध्येय व उद्दिष्ट काय आहे, याबद्दल इतके ठाम असणारे ठेंगडी यांचे उदाहरण अनोखे ठरावे. राजकीय प्रगतीऐवजी त्यांनी भारतीय किसान संघ, ग्राहक पंचायत, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सामाजिक समरसता मंच या वेगवेगळ्या संघटना उभारण्यात धन्यता मानली. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण, जॉर्ज फर्नांडिस, सर्व कम्युनिस्ट नेत्यांशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करण्यातून ठेंगडी यांची लोकसंग्राहक वृत्ती आणखी

अधोरेखित झाली. त्यांच्या नावावर अनेक ग्रंथ जमा झाले. हे ग्रंथ केवळ संघविचार आणि कामगार चळवळीभोवती फिरताना दिसत नाहीत. समाजातील घटनांकडे फार बारकाईने पाहणे, हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक विशेष होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धर्माची दीक्षा घेत असताना, त्या कार्यक्रमाच्या वेळी आवर्जून उपस्थित राहणे, मल्लपूरममध्ये धर्मांतर झाल्यावर सामाजिक समरसता मंचाची उभारणी याच्यातूनच त्यांच्या समाजाभिमुख दृष्टीची प्रचिती येते. संघविचार परदेशात पोचविण्याचा प्रारंभ करणारेही दत्तोपंतच. जमिनीवर पाय ठेवून चिंतन करण्यामुळे एकाच वेळी ते नेते होते आणि शेवटच्या फळीत चालणारे स्पंदन टिपणारे संवेदनशील संघटकही होते. भारताच्या अर्थकारणाने नवे वळणे घेतले असताना, 'समाजस्वास्थ्य टिकविणारे अर्थकारण राबवा' ही भूमिका आग्रहाने मांडण्यातून त्यांच्या मनाच्या गाभ्यात असणा-या शेवटच्या माणसाची आर्त हाकच व्यक्त होत होती. स्वतःचा संसार न मांडता राष्ट्रसमर्पणाचा मार्ग अनुसरणाऱ्या या ज्येष्ठ प्रचारकास त्रिवार अभिवादन.

**(दै. सकाळमधील दि. १६ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेला अग्रलेख)**

# समरसतेचा मंत्रद्रष्टा

सामाजिक समरसता मंचाची स्थापना मा. दत्तोपंत ठेंगडी यांच्या हस्ते १४ एप्रिल १९८३ रोजी पुण्याला झाली. १९८३ साली माझ्याकडे रा. स्व. संघ मुंबई महानगर सहकार्यवाह अशी जबाबदारी होती. समरसता मंचाच्या स्थापनेची बातमी वृत्तपत्रातून मी ऐकली पण खरं सांगायचं तर त्या बातमीचा अर्थ मला समजला नाही. समरसता हा शब्दही समजला नाही.

महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण, महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी, महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधन यात समता हा शब्दप्रयोग नेहमी येत असतो. मला तो समजत होता. दलित चळवळीचा नुकताच मी अभ्यास आणि वाचन करू लागलो होतो. डॉ. बाबासाहेबांचे लिखाण मी याच काळात अधाशासारखे वाचले होते. या सर्व वाचनात समरसता हा शब्द मला कुठेही भेटला नव्हता. भविष्यात मलाच समरसता मंचाचे काम करावे लागेल असे तेव्हा मला स्वप्नातही वाटले नव्हते.

मुंबईतील चेंबूर येथे १९८४ साली गुजरात-विदर्भ-महाराष्ट्र या तीन प्रांतांचा द्वितीय वर्षाचा संघ शिक्षा वर्ग होता. या वर्गाचा मी कार्यवाह होतो. मा. दत्तोपंत ठेंगडी यांचा संघ शिक्षा वर्गाचा प्रवास होता. त्यांचा बौद्धिक वर्ग होता. त्या दिवशी मी त्यांना विचारले, 'समता हा शब्दप्रयोग वापरात असताना समरसता हा नवीन शब्दप्रयोग आपण कशासाठी करत आहोत? समता या शब्दाचा अर्थ चटकन समजतो. लोकांनाही तो समजतो. मग तोच शब्द आपण का नाही वापरत? सामाजिक समता मंच असे नाव का नाही देत?'

यावर मा. दत्तोपंत म्हणाले, 'प्रत्येक शब्दाला विशिष्ट अर्थ असतो. समता हा शब्दप्रयोग हल्ली ज्या संदर्भात वापरला जातो, तो संदर्भ मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा आहे. आपणही तो शब्दप्रयोग वापरला तर दुसऱ्याची उसनवारी केली असे होईल. आपला स्वतंत्र 'ॲप्रोच' लोकांच्या लक्षात येणार नाही. समरसता हा शब्दप्रयोग आपल्या तत्त्वज्ञानातील आहे. या शब्दाची मुळे भारतीय विचारदर्शनात आहेत आणि या शब्दाच्या साहाय्याने आपले म्हणणे आपण लोकांपुढे यथार्थपणे मांडू शकतो.'

एका अर्थाने विचाराला दिशा देणारा आणि माझ्या भावी काळाची दिशा ठरविणाराही असा हा संवाद झाला. दत्तोपंतांच्या बोलण्यातील पूर्ण अर्थ मला तेव्हा उमगला असे नव्हे. दत्तोपंतांच्याच शब्दात सांगायचे तर अर्थाची 'प्रोग्रेसिव्ह अनफोल्डमेंट' सुरु आहे. डॉ. बाबासाहेबांचे वाचन करीत असताना 'माझ्या जीवनाचे तत्त्वज्ञान' या विषयाने एकदा माझे लक्ष्य वेधून घेतले. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही माझ्या जीवनाची तत्त्वत्रयी आहे. यात बंधुतेला मी सर्वोच्च स्थान देतो. ही तत्त्वे मी माझे गुरु भगवान गौतम बुद्ध यांच्या शिकवणीतून घेतली आहेत,' असे बाबासाहेबांचे वाक्य वाचून मी थांबलो आणि मला एकदम दत्तोपंतांचीच आठवण झाली. डॉ. बाबासाहेब सांगतात की, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वत्रयी मी फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतलेली नाही तर भगवान गौतम बुद्ध यांच्या शिकवणीतून घेतली. डॉ. बाबासाहेबांनाही उधार-उसनवारी मान्य नव्हती असा याचा अर्थ झाला. आपली मुळे कापायला डॉ. बाबासाहेब तयार नव्हते. दत्तोपंतांनीही हीच गोष्ट चेंबूरच्या वर्गात मला सांगितली.

महाडच्या संघशाखेवर, साल बहुधा १९६२ असावे, मा. दत्तोपंत ठेंगडी यांचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर बौद्धिक वर्ग झाला. त्याची पुस्तिकाही झाली. त्यानंतर वीस वर्षांनी मी ही पुस्तिका वाचली. डॉ. बाबासाहेबांचे चरित्र कसे वाचायचे, हे या बौद्धिक वर्गाने मला शिकविले. डॉ. बाबासाहेब आणि हिंदू समाज, डॉ. बाबासाहेब आणि भगवा ध्वज, डॉ. बाबासाहेब आणि संस्कृत, डॉ. बाबासाहेब आणि सामाजिक ऐक्य असे कितीतरी विषय पुढे नीट समजत गेले. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाकडे बघण्याची विधायक आणि भावात्मक दृष्टी तयार झाली. बाबासाहेबांकडे बघण्याचा दृष्टीकोनच पार बदलून गेला आणि माझ्या नकळत डॉ. बाबासाहेब हा माझ्या निरंतर चिंतनाचा विषय झाला.

महाराष्ट्रात समरसता मंचाच्या कामाला हळूहळू आकार येऊ लागला. १९८७ साली पुण्याच्या भरत नाट्य मंदिरात दलित क्षेत्रात सेवाकार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा सत्कार थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते करण्यात आला. मा. दत्तोपंत यांचे प्रमुख भाषण झाले. त्यांचे भाषण या कार्यक्रमाचा कळसाध्याय ठरले. पण नम्रता किती ! भाषणाचा प्रारंभ करताना ते म्हणाले, 'गाण्याची सुंदर मैफल चालली असावी. नामवंत गवयी गात आहेत. अशा प्रसंगी यजमानाने म्हणावे की आमचा गोपाळसुद्धा उत्तम गातो. त्याचेही

गाणे होऊ द्यावे... माझी स्थिती अशी आहे.' हा त्यांचा नम्र भावच सगळ्या सभेला जिंकून गेला.

मराठवाडा विद्यापीठाने त्यांची तीन व्याख्याने ठेवली होती. या तीन व्याख्यानात त्यांनी महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचा विवेचक आढावा घेतला. ही भाषणे पुस्तक रुपानेही प्रकाशित झाली. विद्यापीठाने दिलेले सर्व मानधन त्यांनी औरंगाबादहून प्रकाशित होणाऱ्या एका दलित नियतकालिकास देऊन टाकले. हे नियतकालिक समरसतेचा प्रचार करणारे नाही, समरसतेवर आगपाखड करणारे आहे. पण दलित जनतेचे अन्य विषयांवर उत्तम प्रबोधन करणारेही आहे. दत्तोपंतांनी त्याची ही भावात्मक बाजू लक्षात घेतली.

'रिडल्स'वादाचे अत्यंत नाजुक प्रकरण १९८७ साली महाराष्ट्रात उद्‌भवले. डॉ. बाबासाहेबांच्या नावावर प्रभू रामचंद्रांची निंदानालस्ती करणारे लिखाण महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केले. या रिडल्स प्रकरणावर मा. दत्तोपंतांनी लिहिलेल्या, पण त्यांच्या निधनापूर्वी प्रकाशित न झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील ग्रंथात सविस्तर माहिती दिली आहे. संघाच्या संस्कारांमुळे आणि दत्तोपंतांच्या वैचारिक सहवासामुळे अशा प्रसंगी आपण भावात्मक आणि समन्वयवादी भूमिका घेणे आवश्यक आहे हे कुणीही न सांगता समजले. त्यावेळी तसे मी वृत्तपत्रीय लिखाण केले. मा. दत्तोपंतांना ते आवडले.

समरसता मंचाच्या कामाकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. एकदा भेटीत मी त्यांना विचारले, 'हे कार्य १९८३ पूर्वी, वीस वर्षे अगोदर सुरु व्हायला हवे होते. एवढा उशीर आपण का केला?' ते हसले आणि म्हणाले, 'मी तुला एक किस्सा सांगतो. तू म्हणतोस त्याप्रमाणे एकदा पूजनीय गुरुजींकडे हा विषय मी काढला होता. पूजनीय गुरुजी मला म्हणाले की तू हा विषय आपल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मांड. त्याप्रमाणे मी विषय मांडला. तेव्हा त्याला सर्वांनी कडाडून विरोध केला. जातीपातीचा विचार संघात अजिबात होता कामा नये, आपण अस्पृश्यता मानत नाही, एकात्म भावजागृती हेच आपले कार्य आहे असे सर्व विषय आले. गुरुजींनी विषय मला का मांडायला सांगितला हे नंतर मला समजले. गुरुजीच सांगत असत-Hasten slowly (घाई करा, पण सावकाश !) कोणत्याच गोष्टीची फार घाई करून चालत नाही, ती गोष्ट करण्यासाठी योग्य वेळ यावी लागते.'

समरसता मंचाचे कार्य कसे करावे? याबद्दलचे त्यांचे सूत्र Hasten slowly हेच होते. फार घाई करू नका. त्याने हातात काही पडणार नाही असे ते सांगत. ते जाणीव देत

की दलित समाजात आता जागृती झाली आहे. ते चटकन आपल्या बोलण्यावर विश्वास ठेवणार नाहीत. आपल्याकडे संशयाने पाहतील. दलित समाजातील पहिल्या फळीतील नेते आपल्या व्यासपीठावरही येणार नाहीत. जाणीवपूर्वक ते टाळतील. आपल्यावर जहरी टीका करतील. असे सर्व होणार हे गृहित धरून काम केले पाहिजे. दुसऱ्या, तिसऱ्या फळीतील युवकांशी संपर्क वाढविला पाहिजे. हीच मंडळी आपल्या जवळ येण्याची शक्यता आहे.

कार्यक्रम कोणते करावेत, याविषयी ते म्हणत की, कोणताही भडक कार्यक्रम आपण करू नये. केवळ प्रसिद्धीचा कार्यक्रमही करू नये. सामाजिक सत्पुरुषांची जयंती वा पुण्यतिथी साजरी करावी. सर्व लोकांना त्यात सहभागी करून घ्यावे. अन्याय-अत्याचारांच्या घटनांच्या संदर्भात प्रत्यक्ष घटनास्थळी आपण जावे. परिस्थिती पाहावी, अभ्यास करावा आणि आवश्यक असेल तेव्हा पत्रकही काढावे. आपले कार्य 'लोकांना जोडण्याचे' आहे हे कायम लक्षात ठेवावे.

चिंचवडला १९९३ साली समरसता मंचाचे अधिवेशन होते. या अधिवेशनात टेक्सास गायकवाड यांना एका विषयावर भाषण करण्यासाठी बोलाविले होते. टेक्सास गायकवाड हे दलित चळवळीत विधायक कार्य करणारे कार्यकर्ते आहेत. दलित रंगभूमीचे ते खंदे कार्यकर्ते आहेत. पाच-सहा वर्षे ते मंचाच्या विविध व्यासपीठांवर येत होते. औचित्यभंग करणारे भाषण त्यांनी कधी केले नाही. परंतु चिंचवडच्या अधिवेशनात त्यांनी हिंदुत्व, हिंदूधर्म, भगवान श्रीराम या विषयांवर असभ्य भाषेत ताशेरे झाडले. त्यांच्या भाषणाच्या विषयाशी त्याचा काही संबंध नव्हता. एका अर्थाने ते अत्यंत घाणेरडे आणि गलिच्छ भाषण झाले. व्यासपीठावर तेव्हा दत्तोपंत बसलेले होते. समोर मोरोपंतही होते. आम्हाला अगदी थोबाडीत मारल्यासारखे झाले. कुठून दुर्बुद्धी झाली आणि टेक्सासचे भाषण ठेवले असे झाले! भाषण मध्येच थांबविणे, सभेत गोंधळ घालणे ही आपली परंपरा नसल्याने चेहरा निर्विकार ठेवून आम्ही भाषण ऐकत बसलो.

समारोपाच्या भाषणात दत्तोपंत काय बोलतात याविषयी आमच्यासहित सर्वच आतुर झाले होते. समरसता व्यासपीठावरून त्या दिवशी पहिल्यांदाच मा. दत्तोपंतांनी हिंदूराष्ट्र विचारामागची वैश्विक भूमिका मांडली. भाषण अप्रतिम झाले. टेक्सास गायकवाडच्या भाषणाचा परिणाम पूर्णपणे धुवून काढणारे झाले. अधिवेशनात जमलेले कार्यकर्ते शांत झाले आणि आत्मविश्वासाने घरी परतले. दत्तोपंतांनी टेक्सास गायकवाडला का

बोलाविले? किंवा असला गाढवपणा का केला? असे आम्हाला काहीही विचारले नाही. उलट कधीकधी व्यक्तीचे मानसिक संतुलन बिघडते आणि स्वार्थ तयार होतात. त्याकडे दुर्लक्ष करावे. टेक्सासशी संबंध तोडू नयेत असा सल्ला दिला.

१३ ऑक्टोबरला समरसता मंचाच्याच बैठकीसाठी मी पुण्यातच होतो. भिकूजी इदातेसुद्धा आले होते. दोनच दिवसांपूर्वी सरकार्यवाह मा. मोहनजी भागवत यांचे पत्र आले होते. त्यांच्याकडे समरसतेचा जाहीरनामा मी पाठविला होता. हा जाहीरनामा चांगला झाला आहे असे त्यांनी कळवून, तरीही तो दत्तोपंतांना दाखवून घ्यावा असे सुचविले होते. दत्तोपंतही पुण्यातच होते. दादा इदातेंनी त्यांना फोन करून 'कधी भेटायला यायचे?' असे विचारले. १४ ऑक्टोबरला सकाळी दहा वाजता भेटण्याचे ठरले.

बैठक सुरु असतांनाच दुपारी तीन वाजता मोतीबाग कार्यालयातील अच्युतराव कोल्हटकर बैठकस्थानी आले. त्यांनी मला बाहेर बोलावून घेतले आणि हळू आवाजात सांगितले की, 'दत्तोपंत गेल्याचा फोन आला होता. बातमीची शहानिशा करायची आहे. तुमच्याकडे दत्तोपंतांच्या पुण्यातील निवासस्थानाचा फोन आहे का?' मी दादा इदातेंनाही बाहेर बोलावून घेतले. त्यांनासुद्धा ही बातमी सांगितली. ते म्हणाले, 'ज्यांचा फोन आला ते खोटी बातमी देणार नाहीत.' ती वेळ दुपारी तीन-सव्वातीनची असावी. पुढील काही मिनिटातच ही बातमी पूर्णपणे खरी ठरली. समरसतेच्या एका महत्त्वाच्या दस्तऐवजावर चर्चा न होताच दत्तोपंत निघून गेले होते. अशावेळी मला संघ गीताच्या ओळी आठवल्या-

**भला चला जा जहाँ कोटी हात**
**देख रहे है बाँट वीर व्रत**
**देख वहीं से अपने पथ के**
**पथिकों का प्रचलन रणगान**
**धन्य तुम्हारा जीवनदान...**

**(दै. तरुण भारत मधील दि. २० ऑक्टोबर २००४ रोजीचा लेख)**

❋ ❋ ❋

# थोर तत्वचिंतक, संघटक

दत्तोपंत ठेंगडी यांच्या निधनाने हिंदुत्वाच्या चळवळीतील एक थोर तत्त्वचिंतक आणि संघटक हरपला आहे. डाव्या चळवळीची एकाधिकारशाही मानल्या गेलेल्या कामगार क्षेत्रात दत्तोपंतांनी राष्ट्रवादी विचारांच्या आधारावर कामगार संघटनेची स्थापना केली व पन्नास वर्षांच्या आतच ती संघटना डाव्या कामगार संघटनांना मागे टाकून देशातील अग्रगण्य कामगार संघटना बनली एवढी एकच गोष्ट दत्तोपंतांच्या संघटनकुशलतेचा पुरावा देण्यास पुरेशी आहे. परंतु दत्तोपंतांचे कर्तृत्व केवळ कामगार संघटना उभी करण्यापुरते मर्यादित नव्हते तर हिंदुत्वाच्या चळवळीला भक्कम वैचारिक अधिष्ठान देण्याची मोलाची कामगिरी त्यांनी पार पाडली.

हिंदू समाजाला संघटित करून देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे या उद्देशाने स्थापन झालेल्या रा.स्व. संघात दत्तोपंतांनी स्वयंसेवक म्हणून प्रवेश केला आणि स्वतःचे जीवन संघाला समर्पित केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संघासमोर हिंदू सांस्कृतिक विचारधारेवर राष्ट्राची उभारणी करणे शक्य आहे हे सिद्ध करण्याचे आव्हान पुढे ठाकले. विसाव्या शतकावर साम्यवाद, भांडवलशाही, समाजवाद आदी विचारांचा प्रभाव होता व यापैकी कोणती तरी एखादी विचारधारा स्वीकृत केल्याशिवाय गत्यंतर नाही असे देशातीलच नव्हे, तर जगातील वातावरण होते. या पार्श्वभूमीवर हिंदू जीवनमूल्यांमध्ये कालानुरूप परिवर्तन करून समाजाची नवरचना करण्याचे आव्हान संघापुढे उभे होते. श्रीगुरुजींच्या मार्गदर्शनाखाली स्व. दीनदयाळ उपाध्याय, दत्तोपंत ठेंगडी आदींनी ते समर्थपणे पेलण्याचा प्रयत्न केला.

भारतीय मजदूर संघाची स्थापना करीत असताना दत्तोपंतांनी याच तत्त्वचिंतनाचा आविष्कार विविध रूपांनी घडविला. १ मे या कामगार दिनाऐवजी विश्वकर्मा दिनाचा पर्याय दिला, लाल झेंड्याऐवजी भगवा झेंडा कामगार क्षेत्रात फडफडू लागला, 'देशाचे औद्योगिकीकरण, श्रमिकांचे राष्ट्रीयीकरण आणि उद्योगाचे श्रमिकीकरण' अशी नवी घोषणा भारतीय मजदूर संघाने दिली. आपल्या संघटनकौशल्याने आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षातच

भा.म. संघाची गणना पहिल्या चार प्रमुख कामगार संघटनांत गणली गेली व नंतर काही वर्षांतच भा.म. संघाने पहिला क्रमांक पटकावला.

भारतीय मजदूर संघापाठोपाठ किसान संघ, सामाजिक समरसता मंच, स्वदेशी जागरण आदी विविध संस्थांच्या स्थापनेत दत्तोपंतांचा सहभाग होता. समतायुक्त व शोषणमुक्त समाज हे हिंदुत्ववादी चळवळीचे उद्दिष्ट आहे आणि हे उद्दिष्ट अराजकीय पातळीवर विविध व्यावसायिक संघटनांच्या माध्यमातूनच साध्य होईल अशी दत्तोपंत ठेंगडी यांची धारणा होती.

आणीबाणीमधील दत्तोपंतांची भूमिका अशीच अनोखी होती. भूमिगत अवस्थेत असताना सर्व राजकीय पक्षांचे व नेत्यांचे संघटन करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रक्रियेत त्यांनी विविध पक्षांतील राजकीय नेत्यांचा विश्वासही संपादन केला. परंतु आणीबाणी उठताच व जनता पक्ष सत्तेवर येताच राजकारणाचा पूर्णपणे त्याग करून पुन्हा कामगार क्षेत्रात ते परतले. त्यांनी केंद्रीय मंत्रीपद घ्यावे यासाठी अनेक प्रयत्न झाले, त्यांच्यावर दबावही आला पण त्यांनी आपली भूमिका व निर्धार कायम ठेवला. राजकारण हे त्याज्यही नाही पण सर्वंकष, सर्वश्रेष्ठही नाही अशी त्यांची भूमिका होती. पाश्चात्त्य विचार हा राजकारणकेंद्री आहे व समाजाच्या सर्व घटकांचे नियंत्रण तो राजकारणाच्या माध्यमातून करू पाहतो म्हणून या विचारधारेला समाजकेंद्री विचारधारेने पर्याय दिला पाहिजे अशी दत्तोपंतांची भूमिका होती. आज राजकारणाच्या मर्यादा स्पष्ट होत चालल्याने अशासकीय, अराजकीय मार्गाने विकास प्रक्रिया घडविण्याचे वेगवेगळे विचार समाजापुढे ठेवले जात आहेत. परंतु या प्रयत्नांना सामाजिक मूल्य निर्मितीच्या प्रयत्नांची जोड नसेल तर ते यशस्वी होणार नाहीत. याचे कारण अशा प्रयत्नांना सामाजिक विश्वासार्हता मिळत नाही. त्यामुळे सामाजिक व व्यक्तिगत मूल्यांची जोपासना करून त्या आधारावर व्यावसायिक संघटना उभी करणे आणि त्या आधारावर विकेंद्रित समाजव्यवस्था उभी करणे ही दत्तोपंतांच्या विचारांची दिशा होती.

इंग्लंड व युरोपमध्ये भांडवल आणि तंत्रज्ञान यांची झालेली हातमिळवणी कामगारांच्या शोषणाचे कारण बनली आणि त्याची प्रतिक्रिया कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाच्या रूपाने उमटली. जेव्हा जगभरात जागतिकीकरणाची भाषा बोलली जाऊ लागली तेव्हा त्यामागे असलेल्या बाजारपेठीय भूमिकेमागील तत्त्वज्ञानाची भयानकता दत्तोपंतांना कळली होती.

त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. उपभोगवादी मनोवृत्तीला मुक्त संचार करायला लावून तंत्रज्ञान आणि भांडवल यांच्या आधारावर नफा मिळविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा तोंडवळा त्यांनी ओळखला होता. आधी मुक्तहाताने कर्जे वाटून गावातील सर्व जमीनजुमला गहाणवट टाकून गावकऱ्यांना आर्थिक गुलाम बनविणारी सावकारशाही व विविध जागतिक वित्तीय संघटनांना सोबत घेऊन जगाला ग्रासू पाहणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या यात मूलतः कोणताच फरक नाही हे दत्तोपंतांनी ओळखले होते. अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मुक्तसंचाराला सरकार जनतेच्या दबावाने अटकाव करेल, म्हणून सरकारचे सार्वभौमत्वच खच्ची करण्याचा डाव या जागतिकीकरणामागे आहे हे दत्तोपंतांना जाणवत होते. त्यांनी आपली भीती, भूमिका स्वदेशी जागरण मंचाच्या रूपाने स्पष्टपणे जगापुढे मांडली व म्हणून ते तथाकथित मुक्त अर्थव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांच्या टीकेचे लक्ष्य बनले.

केवळ 'जुने ते सोने' म्हणून कवटाळून बसणारा समाज वा व्यक्ती कालविसंगत होते तर जुने सर्व टाकून नव्याने सर्व घटक हवेत म्हणणारा समाज वा व्यक्ती दिशाहीन होतात. स्वतःची सांस्कृतिक मूल्ये जपत कालानुसार स्वतःमध्ये बदल घडविणारेच अंतिमतः यशस्वी होतात. रा.स्व. संघाची भूमिका, विचार, तत्त्वज्ञान यातच सामावलेले आहे. जे बोलतो तेच आपल्या जीवनात आचरले पाहिजे असा त्यात आग्रह असतो. रा.स्व. संघाने पुरस्कारलेल्या तत्त्वज्ञानाचे वैचारिक विश्लेषण, संघाने जोपासलेल्या मूल्यांचे जीवनात प्रकटीकरण आणि आपल्या संघर्षप्रवण संघटनकौशल्याने मिळविलेली समाजमान्यता याचा सुरेख त्रिवेणी संगम त्यांच्या जीवनात झाला होता.

**(दै. तरुण भारतमधील दि. १५ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेला अग्रलेख)**

# कामगारांचा विश्वस्त

कार्ल मार्क्सने 'जगातल्या कामगारांनो एक व्हा !' अशी हाक दिल्यानंतर शंभर वर्षांनी मार्क्सवादी विचारांच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या काही जणांनी 'कामगारांनो, जगाला एक करा!' अशी घोषणा शिरोधार्य मानून एक कामगार संघटना स्थापन केली. ती संघटना उभी करण्यात दत्तात्रय बापूराव ऊर्फ दत्तोपंत ठेंगडी यांचा सिंहाचा वाटा होता. कायम डाव्या विचारांच्या विरोधात राहूनही या 'भारतीय मजदूर संघा'चे आजमितीला ६५ लाखांहून अधिक सदस्य आहेत. विशेष म्हणजे डाव्या व समाजवादी कामगार चळवळीला कायम फाटाफुटीचे ग्रहण लागले असताना, १९५५ मध्ये स्थापन झालेली ही संघटना आजवर अभेद्य राहिली; त्यास दत्तोपंतांचा त्याग व निष्ठाच कारणीभूत आहे. त्यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परिवारातील 'जनसंघा'चा भारतीय जनता पक्ष या नावाने पुनर्जन्म झाला आणि पुढे दोन दशकांनी त्याने केंद्राची सत्ता ताब्यात घेतली, तरी त्याविरोधात तोफा डागण्यास दत्तोपंत कधी कचरले नाहीत आणि याच सरकारने दिलेला पद्मभूषण पुरस्कार नाकारण्याचे धैर्यही त्यांनी दाखविले. कारण कामगारांबरोबरच स्वदेशीच्या विचारांवरही त्यांची तितकीच श्रद्धा होती.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातच कामगारांचे प्रश्न घेऊन अनेकांनी काम करायला सुरुवात केली, त्यात प्रामुख्याने कम्युनिस्ट व समाजवादी नेत्यांचा पुढाकार होता आणि या चळवळीवर मराठी नेत्यांचे वर्चस्व होते. ना. म. जोशी, नारायण मेघाजी लोखंडे, कॉ. एस. ए. डांगे यांच्यापासून बी. टी. रणदिवे, परुळेकर तसेच साथी एस. एम. जोशी यांचा त्यात समावेश होता. पण रा. स्व. संघाच्या मुशीतून तयार झालेल्या काहींनी स्वातंत्र्यानंतर 'उजव्या' विचारांची पाठराखण करण्यासाठी कामगारांना एकत्र आणण्याचे ठरविले. हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांच्यावर असीम निष्ठा असलेल्या या मोजक्याच कार्यकर्त्यांकडून कामगारांच्या नोंदणीपासून अनेक कामे दत्तोपंतांनी आपल्या संघटन चातुर्याच्या जोरावर करून घेतली आणि भारतीय मजदूर संघ वाढू लागला. तळागाळातल्या 'ब्ल्यू कॉलर' कामगारांपेक्षा संघपरिवारातील 'व्हाईट कॉलर' मध्यमवर्गाला दत्तोपंतांनी

आपले लक्ष्य केले होते. संघपरिवाराचे संस्कार असूनही दत्तोपंत हे काही प्रमाणात उदारमतवादी होते आणि मराठी-इंग्रजीइतकेच त्यांचे उर्दूवरही प्रभुत्व होते आणि त्याचा उपयोग त्यांना संघटनेचे बळ वाढविण्यास होत असे.

दत्तोपंतांवर प्रारंभीच्या काळात काँग्रेसचे संस्कार झाले होते. तरीही ही संघटना उभी करण्यासाठी संघाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांचीच निवड केली होती. जयप्रकाशांच्या जनता पक्षाच्या प्रयोगात संघपरिवार काही विशिष्ट हेतू ठेवून सहभागी झाला, तेव्हा त्यात नानाजी देशमुखांइतकाच दत्तोपंतांचाही पुढाकार होता. नानाजी काय किंवा दत्तोपंत काय, त्यांच्यावर भारतातील आश्रम संस्कृतीचे संस्कार होते आणि गोळवलकर गुरूजींच्या आर्थिक विचारांचा प्रभाव होता. 'देशात लाखो लोक उपाशी तडफडत असताना संपत्तीचे उद्दाम प्रदर्शन करणे योग्य नव्हे,' असे मत १९७२ मध्ये संघ प्रचारकांच्या राष्ट्रीय बैठकीत गुरूजींनी व्यक्त केले होते. त्यामुळेच केंद्रात सत्ता आल्यावर भाजपने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणाचे आणि विशेषतः वाजपेयी सरकारच्या कारभाराचे त्यांनी वाभाडे काढले होते. या धोरणात भाजपने बदल न केल्यास पराभव अटळ आहे, असा इशारा त्यांनी दोन वर्षांपूर्वीच दिला होता. तो भाजपने मानला नाही आणि पराभव ओढवून घेतला. त्यांच्या द्रष्टेपणाचा यापेक्षा वेगळा दृष्टांत देण्याची गरज नाही. आपण समाजाचे 'विश्वस्त' म्हणून काम करायला हवे, असे गोळवलकर गुरुजी कायम सांगत. दत्तोपंतांच्या निधनाने कामगारांचा एक विश्वस्त आपल्यातून निघून गेला आहे.

**(दै. महाराष्ट्र टाईम्समधील दि. १६ ऑक्टोबर रोजी प्रकाशित अग्रलेख)**

# शब्दरूप श्रद्धांजली

## आदर्श प्रचारक हरपला -मदनदास देवी

दत्तोपंत ठेंगडी हे आदर्श स्वयंसेवक व आदर्श प्रचारक होते. मराठी, संस्कृत भाषांव्यतिरिक्त मल्याळम् व बंगाली भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांच्यातील उत्कृष्ट संघटकवृत्तीमुळे ते जातील तेथे कार्य उभे करतील असा विश्वास परमपूज्य गुरुजींना होता. त्यामुळे त्यांनी मजदूर संघाची जबाबदारी दत्तोपंतांवर सोपविली. दत्तोपंतांनी मजदूर संघाची स्थापना केली. त्यांच्या निधनामुळे संघपरिवारात रिक्तता निर्माण झाली आहे ती भरून काढणे कठीण आहे.

## कार्यकर्त्यांचा आधार हरपला - जगदीश गुप्त

दत्तोपंत ठेंगडी यांच्या निधनाने माझे वैयक्तिक नुकसान झाले आहे. भारतीय मजदूर संघाच्या स्थापनेपासून संघटना बांधणीच्या पातळीवर तसेच वैयक्तिक पातळीवरही त्यांचे मोलाचे मार्गदर्शन मला लाभले. सध्याच्या वातावरणात त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि विचार यांचा कार्यकर्त्यांना खूपच आधार वाटत होता.

## कामगार क्षेत्राची अपरिमित हानी -डॉ. बी. डी. मेहता (गांधीवादी अर्थतज्ज्ञ)

दत्तोपंत ठेंगडी यांच्या निधनाने कामगार क्षेत्राची अपरिमित हानी झाली आहे. ते ज्ञानी व तत्त्वचिंतक कामगारनेते होते. भारतीय कामगारांना भारतीय संस्कृतीची जाणीव करून देण्यासाठी ते सदैव प्रयत्नशील असत. भारतीय कामगारांनी डाव्यांची विचारधारा अंगिकारू करू नये अशी त्यांची इच्छा होती. कामगार, श्रमिक वर्गाने अधिकाधिक कुशल बनून उत्पादन वाढविले पाहिजे अशी त्यांची धारणा होती.